किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३● दिनविशेष

५● दोन दशके भूमिपुत्रांची

९● भूमिपुत्रांचे प्रश्न सोडविण्याच्या दिशेने....

१५● अण्वस्त्रे, पर्यावरण आणि जागतिक सुरक्षा

१९● महाराष्ट्रातील लघुउद्योगः स्थिती आणि गती

२९● अर्थबोधपत्रिका पुरवणी
(वाहतूक विकास धोरण समिती अहवालाच्या निमित्ताने...)



**खंड १३ : अंक ५** **ऑगस्ट २०१४**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**



**वार्षिक वर्गणी १००/- रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/चेकने किंवा रोख **‘इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी’** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.** **‘अर्थबोधपत्रिका’** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.



वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०,
२५६५७६९७
ई-मेलः- ispe@vsnl.net
website- www.ispepune.org.in



**अर्थबोधपत्रिका**
**खंड १३ (अंक ५) ऑगस्ट २०१४**
**संपादक - अभय टिळक**
**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**


*‘अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- ◆उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- ◆अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- ◆निःपक्ष व साधार
- ◆सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- ◆मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- ◆निवडक साहित्याचे संकलन
- ◆संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- ◆संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.


◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **‘अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने’** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# दिनविशेष

निसर्गाचे चक्र पाहणे, अनुभवणे हे मनाला प्रसन्नता देणारे. निसर्गातील जैविक विविधता थक्क करणारी आहे. पण निसर्गाने मुक्त हस्ताने केलेल्या उधळणीपेक्षा मानवाला अधिक काहीतरी हवे असते. मग निसर्गात हस्तक्षेप होऊ लागतो आणि पर्यावरणाचा बिकट प्रश्न उभा ठाकतो. या निसर्गसंपत्तीवर अवलंबून असणारे मानवांमधीलच विविध गटसमूह अशा वेळी अडचणीत येतात. मग, भूमिपुत्रांचे प्रश्न पुढे येतात. संयुक्त राष्ट्रसंघाने ९ ऑगस्ट हा भूमिपुत्रांचा दिवस असल्याचे १९९४मध्ये जाहीर केले होते. या शिवाय, अन्य काही विशेष दिवस या महिन्यात आहेत. ऑगस्ट महिन्यातील पहिला रविवार हा मैत्रीदिवस. मैत्रीच्या तरल भावना जागवणारा हा दिवस सरतो न सरतो तोच दुस-या महायुद्धात जपानवर टाकण्यात आलेल्या अणुबॉंबची घटना आठवून मन विषण्ण होते. पहिल्या महायुद्धाची शंभरी या वर्षीच झाली. अणुबॉंबच्या भीषण नरसंहारानंतर हादरलेल्या जगाने ६ ऑगस्ट हा अण्वस्त्रविरोधी दिन ठरवला आहे. अण्वस्त्रे नकोतच या भूमिकेकडे जग आता वाटचाल करीत आहे. तरीदेखील अण्वस्त्रे जगातून हद्दपार झालेली नाहीत. किंबहुना, पर्यावरणीय प्रश्न बिकट झाले, जगभरात पाण्याचा प्रश्न उद्भवला तर अणुयुद्धाची शक्यता अजूनही काही अभ्यासक नाकारत नाहीत. जगभरात छोटेमोठे संघर्ष चालू असले तरी आर्थिक प्रगतीकडे व विकासाकडे जगाची वाटचाल होते आहे हे उल्लेखनीय. देशाच्या आर्थिक विकासात लघुउद्योगांचे एक विशेष महत्त्व आहे. ३० ऑगस्ट हा लघुउद्योग दिवस गणला जातो. औद्योगिकदृष्ट्या पुढारलेले राज्य म्हणून लौकिक असलेल्या महाराष्ट्रातील लघुउद्योगांची अलीकडील काळातील स्थितीगती कशी दिसते यांवर संबंधित आकडेवारीसह दृष्टिक्षेप टाकणारा एक लेख या अंकात आवर्जून समाविष्ट केलेला आहे. भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या एक संलग्न अभ्यासक डॉ. शरदिनी रथ यांनी खास ‘अर्थबोधपत्रिके’साठी तयार केलेला हा लेख सगळ्यांनाच विचारप्रवण बनवणारा ठरावा. तीच बाब भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या नियामक मंडळाचे एक सन्मान्य सदस्य असलेल्या प्रा. डॉ. श्रीरामन यांच्या लेखाची. राष्ट्रीय वाहतूक धोरण विकास समितीने तयार केलेल्या अहवालाचे अंतरंग मांडणारा मजकूर गेल्या महिन्याच्या अंकात सादर केलेला होता. आता त्याच अहवालाची चिकित्सा करणारा डॉ. श्रीरामन यांचा लेख या विषयाबाबतचे आपले आकलन अधिक समृद्ध बनविणारा ठरावा. हे सगळेच विषय ब-यापैकी तांत्रिक भासणारे असले तरी त्यांचा परिचय करून घेणे आपली अर्थसाक्षरता वाढवण्याच्या दृष्टीने आवश्यकच नाही का ? ■■



## वाचकांचा प्रतिसाद

‘अर्थबोधपत्रिका’ हे मासिक वाचनीय, अभ्यासपूर्ण आहे. जुलै २०१४च्या अंकातील ‘सहभाग नागरिकांचा, अभ्यास सातत्यशीलतेचा’ या लेखातील माहिती चांगली आहे.

**ज्ञानेश्वर मोळक, सहआयुक्त, मनपा, पुणे**

## वाचकांना विनंती

‘अर्थबोधपत्रिके’चा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - ‘अर्थबोधपत्रिके’चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्यासाठी www.ispepune.org.in इथे वाचकांनी अवश्य भेट द्यावी.**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भासाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

सामाजिक १

# दोन दशके भूमिपुत्रांची

आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध विषय, प्रश्न आणि त्यांच्याशी संबंधित अन्य मुद्दे यांचे महत्त्व लक्षात घेऊन त्या त्या विषयासाठी संयुक्त राष्ट्रसंघातर्फे विशिष्ट दिन साजरा करण्यात येत असतो. अशा दिनांच्या निमित्ताने त्या विषयांचा सखोल ऊहापोह करण्यात येत असल्याने आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रश्न सोडविण्याच्या दिशेने पावले टाकणे शक्य बनते. तसेच, त्या निमित्ताने त्या विषयांबाबत संपूर्ण जगभरात विचारमंथन घडून येत असते. विविध देशांमधील भूमिपुत्रांसाठी ९ ऑगस्ट हा दिवस राष्ट्रसंघाने मुकर्रर केला आहे. म्हणजे, ९ ऑगस्ट हा 'भूमिपुत्रांचा आंतरराष्ट्रीय दिन' (The International Day of the World's Indigenous People) होय. १९९४च्या डिसेंबरमध्ये झालेल्या सभेत प्रथमच या संदर्भातील घोषणा करतानाच १९९५ ते २००४ हे दशक 'जागतिक भूमिपुत्रांचे दशक' (International Decade of the World's Indigenous People) असल्याचे राष्ट्रसंघाने जाहीर केले होते. त्या नंतर २००५ ते २०१४ हे दुसरे दशक असल्याचे ठरविण्यात आले होते. भूमिपुत्रांच्या प्रश्नांबाबत कृती व त्यांना सन्मान ही दुस-या दशकाची संकल्पना होती. राष्ट्रसंघाच्या आर्थिक व सामाजिक परिषदेतर्फे करण्यात आलेल्या अभ्यास-अहवालांमधून भूमिपुत्र कोणाला म्हणावयाचे, त्यांचे प्रश्न कोणते आहेत व त्यांवरील उपाययोजना कशी करावयाची, यांबाबत बराच ऊहापोह करण्यात आला आहे.

**भूमिपुत्र कोण?**

साधारणपणे असे मानले जाते की, ''एखाद्या भूप्रदेशात दुस-या कोणत्याही वंशाचे/संस्कृतीचे नागरिक प्रवेशण्यापूर्वीपासून त्या भूप्रदेशात वास्तव्य करीत असलेले नागरिक (मूलवासी) हे तेथील भूमिपुत्र होत''. (तेथे नव्याने आलेले नागरिक सत्ता, व्यापार वा अन्य क्षेत्रांत आघाडी मिळवून तेथील समाजात प्रभावशाली ठरू शकतात, पण ती बाब वेगळी).



उदाहरणार्थ, अमेरिकेतील Lakota, ग्वाटेमाला येथील Mayas आणि बोलिव्हिया येथील Aymaras, उत्तर युरोपमधील Saami, ऑस्ट्रेलिया येथील Aborigines, न्यूझीलंड येथील Maori हे नागरिक भूमिपुत्र होत. पूर्वीपासून वास्तव्यास असणा-या या भूमिपुत्रांची संस्कृती, त्या भूमीत नव्याने आलेल्या नागरिकांच्या संस्कृतीपेक्षा भिन्न असते. त्यांचे आचारविचार, राहण्याची पद्धत वेगळी असते. देशोदेशींच्या भूमिपुत्रांमध्ये असणारी विविधता आणि आधुनिक काळातील समाज लक्षात घेऊन भूमिपुत्रांची विशिष्ट अशी व्याख्या संयुक्त राष्ट्रसंघाने केलेली नाही. भूमिपुत्र कोण, याची व्याख्या करण्यापेक्षा भूमिपुत्र कोण आहेत ते ओळखणे/हुडकणे याला राष्ट्रसंघाने महत्त्व दिले आहे. म्हणून या विषयाबाबत व्यापक भूमिका घेऊन काही मुद्यांच्या आधारे भूमिपुत्र कोण ते ठरविण्यात यावे, असे राष्ट्रसंघाने म्हटले आहे. ते मुद्दे असे -

●एखादी व्यक्ती स्वतःला भूमिपुत्र म्हणवून घेत असेल आणि त्या व्यक्तीच्या भूमिपुत्र असण्याला वा म्हणवून घेण्याला तेथील भूमिपुत्रांची मान्यता असेल तर ती व्यक्ती भूमिपुत्र असे मानणे ● व्यक्तीचे समाजाशी इतिहासकाळापासून असलेले परस्परसंबंध लक्षात घेऊन तिचे भूमिपुत्र असणे समजून घेणे ●व्यक्तीचे/समाजाचे त्या भूप्रदेशाशी आणि तेथील नैसर्गिक साधनस्रोतांशी असलेले जैविक नाते समजून घेणे ● भूमिपुत्रांच्या विशिष्ट अशा सामाजिक, आर्थिक व राजकीय पद्धती समजून घेणे ●भूमिपुत्रांची भाषा, संस्कृती, परंपरा आणि श्रद्धा लक्षात घेणे ●समाजात भूमिपुत्रांचे गट स्थापन होणे ● भूमिपुत्रांचे पूर्वापार चालत आलेले सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरण कायम ठेवणे.

भूमिपुत्र ही संज्ञा अनेक शतकांपासून विविध देशांमध्ये वापरली जाते. साहजिकच वेगवेगळ्या देशांत व भाषांमध्ये भूमिपुत्रांसाठी वेगवेगळे शब्द आहेत. साधारणपणे मूळचे नागरिक/मूलवासी, आद्य लोक, जाती-जमाती, आदिवासी, वनवासी, जनजाती, भटके- डोंगराळ प्रदेशातील लोक, शिकार करणारे लोक अशा अर्थाचे काही शब्दप्रयोग या संदर्भात करण्यात येतात. अशा विविध शब्दप्रयोगांतर्गत येणारे सर्व गट साधारणपणे भूमिपुत्रांमध्ये समाविष्ट केले जातात.

**वाटचाल दोन दशकांची...**

१९९५ ते २००४ हे दशक 'जागतिक भूमिपुत्रांचे दशक' असल्याचे राष्ट्रसंघाने प्रथमच जाहीर केले. भूमिपुत्रांचे प्रश्न समजून घेणे, शिक्षण, विकास, आरोग्यविषयक बाबी त्यांच्यापर्यंत पोहचवणे व त्यांच्या सभोवतालचे पर्यावरण जपणे आणि यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर सहकार्य मिळवणे यावर पहिल्या दशकात भर देण्यात आला होता. त्या नंतर भूमिपुत्रांच्या संदर्भातील प्रश्नांसाठी २००५ ते २०१४ हे दुसरे दशक असल्याचे राष्ट्रसंघाने जाहीर केले होते.

आजमितीस जगभरातील ७० देशांमधील सुमारे ३७ कोटी नागरिक भूमिपुत्र या गटात मोडतात, ही बाब इथे उल्लेखनीय ठरते. दरम्यान, आंतरराष्ट्रीय पातळीवर भूमिपुत्रांच्या प्रश्नांबाबतची चर्चा घडून येत असताना भूमिपुत्रांच्या मानवाधिकारांचा मुद्दा उपस्थित झाला. त्या नंतर मानवाधिकार परिषदेने २००६मध्ये केलेल्या सूचनेचा विचार करून देशोदेशींच्या भूमिपुत्रांचे अधिकार जपण्याबाबतचा ठराव राष्ट्रसंघाने २००७मध्ये मंजूर केला (Declaration on the Rights of Indigenous People). देशोदेशींच्या अन्य नागरिकांप्रमाणेच देशोदेशींच्या भूमिपुत्रांना समान अधिकार आहेत, भूमिपुत्रांची संस्कृती भिन्न असली तरी त्यांचे वेगळेपण लक्षात घेऊन त्यांच्याप्रती आदराची भूमिका असावी, विविधतेमधूनच संस्कृती व समाजजीवन संपन्न होत असते, असे राष्ट्रसंघाने या ठरावात स्पष्ट केले होते. वांशिक, धार्मिक, सांस्कृतिक भिन्नतेवर वा वर्णभेदावर आधारित धोरणे आखणे हे चुकीचे असून देशांतील सर्व नागरिकांप्रती समानतेचा दृष्टिकोण बाळगणे गरजेचे आहे, असेही राष्ट्रसंघाने त्या ठरावात नमूद केले होते.

वासाहतिक धोरणांमुळे भूमिपुत्रांवर अन्याय झाला आणि त्यांना त्यांच्या गरजेनुसार व अपेक्षेनुसार विकास करता आला नाही, याबाबत खेद व्यक्त करून भूमिपुत्रांचे अधिकार जपण्यासाठी सुयोग्य धोरणे आखण्यात यावी; भूमिपुत्रांची सांस्कृतिक, आध्यात्मिक, ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेऊन त्यांचे अधिकार त्यांना मिळावेत असेही म्हणण्यात आले होते. विशेषतः, विकासविषयक प्रकल्प राबवताना भूमिपुत्रांच्या अधिकारांची दखल घेतली जावी अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती.



पहिल्या दशकात भूमिपुत्रांच्या प्रश्नांबाबत विविध पातळ्यांवर सर्वंकष विचार करण्यात आला होता. तर २००५ ते २०१४ या दुसऱ्या दशकात भूमिपुत्रांच्या प्रश्नांबाबत कृती करण्याला महत्त्व देण्यात आले होते. त्या दिशेने वाटचाल करण्यासाठी विविध अभ्यास करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली होती. तसेच पाच प्रमुखे उद्दिष्टे राष्ट्रसंघाच्या समितीपुढे ठेवण्यात आली होती. ती अशी -

(१) आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवर धोरणे आखताना, कायदे व नियम बनविताना, नैसर्गिक साधनस्रोतांचा वापर करताना आणि विकासप्रकल्पांची आखणी करताना भूमिपुत्रांप्रती समानतेचा दृष्टिकोण अवलंबून सर्व पातळ्यांवर काम करताना त्यांना सहभागी करून घेणे

(२) भूमिपुत्रांच्या दैनंदिन जीवनव्यवहारांवर परिणाम घडवून आणणाऱ्या सर्व विकासकामांशी संबंधित (विशेषतः, जमीन व नैसर्गिक साधनस्रोतांचा वापर) निर्णयप्रक्रियांमध्ये भूमिपुत्रांचा एक समाज म्हणून पूर्ण व प्रभावी सहभाग मिळवणे.

(३) भूमिपुत्रांच्या संस्कृतीपासून आणि समानतेच्या दृष्टिकोणापासून फारकत घेणारी विकासविषयक धोरणे पुन्हा नीट आखणे. अशी धोरणे आखताना भूमिपुत्रांच्या सांस्कृतिक व भाषिक विविधतेचा मान राखणे.

(४) भूमिपुत्रांच्या समाजाचा विकास आणि विशेषतः, भूमिपुत्र गटातील स्त्रिया, लहान मुले-मुली आणि युवावर्ग यांच्या विकासावर भर देणारे कार्यक्रम, विकासयोजना आणि धोरणे आखणे.

(५) भूमिपुत्रांच्या विकासाशी संबंधित असलेल्या विविध धोरणांच्या अंमलबजावणीच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय व विशेषतः राष्ट्रीय पातळीवर देखरेखीच्या, नियंत्रणाच्या यंत्रणा तयार करणे व भूमिपुत्रांचे हक्क/मानवाधिकार अबाधित राहतील याची काळजी घेणे.

या उद्दिष्टांनुसार भूमिपुत्रांचे प्रश्न सोडविण्याबाबत काही अभ्यास-अहवाल तयार करण्यात आले आहेत. कोणत्याही देशांत विकासविषयक धोरणे आखताना भूमिपुत्रांबाबत पहिला प्रश्न पुढे येतो तो त्यांच्या जमीनविषयक अधिकारांचा. या संदर्भात कुठे, कोणते प्रश्न उद्‌भवले व ते कसे सोडविण्यात आले याचा ऊहापोह पुढील लेखात मांडला आहे. ■■

सामाजिक २

# भूमिपुत्रांचे प्रश्न सोडविण्याच्या दिशेने....

जगभरात झालेल्या भूमिपुत्रांच्या चळवळींमध्ये जमिनीवरील अधिकाराचा प्रश्न हा कायमच महत्त्वाचा ठरलेला आहे. कारण देशोदेशींच्या भूमिपुत्रांचे आपल्या मातीशी-जमिनीशी घट्ट नाते असते. जमीन ही त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन असतेच, त्याचबरोबर जीवनव्यवहारात ती त्यांची 'निजखूण' (आयडेन्टिटी) असते. त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक ओळखीत व्यक्तीकडे 'जमीन असणे' मानाचे मानले जाते. या पार्श्वभूमीवर, कोणत्याही देशात विकासविषयक प्रकल्प राबवताना भूमिपुत्रांच्या जमिनींचा प्रश्न उपस्थित झाला तर तो संघर्षाचा मुद्दा बनणे स्वाभाविक ठरते.

आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या वतीने १९५७मध्ये आणि १९८९मध्ये आयोजित करण्यात आलेल्या भूमिपुत्रांच्या अधिवेशनात जमीनविषयक मुद्दा चर्चेचा ठरला होता. १९५७ मध्ये habitual territories असा शब्दप्रयोग करण्यात आला होता. तर, १९८९मध्ये भूमिपुत्रांचे जमिनीशी असलेले नाते, त्यांच्या सभोवतालचे एकूण पर्यावरण आणि त्यांच्या सांस्कृतिक-सामाजिक परंपरा हे मुद्दे अधोरेखित करण्यात आले होते. नैसर्गिक साधनस्रोतांच्या वापरात व रक्षणात भूमिपुत्रांचा सहभाग हे महत्त्वाचे मुद्देही तेव्हा मांडले गेले. या मुद्द्यांची दखल घेऊन संयुक्त राष्ट्रसंघाने भूमिपुत्रांचे अधिकार जपण्याबाबतचा ठराव २००७मध्ये मंजूर केला होता. या पार्श्वभूमीवर, भूमिपुत्रांच्या अधिकारांबाबत कुठे, कोणते प्रश्न उपस्थित झाले व ते सोडविण्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न इत्यादी बाबींचा परिचय करून घेणे उद्बोधक ठरावे. जगभरातील ३७ कोटी भूमिपुत्रांपैकी सुमारे ७० टक्के भूमिपुत्र आशियात वास्तव्यास आहेत. त्यामुळे आशियातील भूमिपुत्रांबाबत राष्ट्रसंघाच्या गटाने विशेष अभ्यास केला आहे. बांगलादेश व फिलिपिन्स या देशांमधील घडामोडी अभ्यास-अहवालात मांडण्यात आल्या आहेत. बांगलादेशातील भूमिपुत्रांचा - चकमांचा - प्रश्न लक्षात घेता तेथील घडामोडी भारतासाठी अभ्यसनीय ठरतात.



**काय घडले बांगलादेशातील डोंगराळ प्रदेशात?**

बांगलादेशाच्या आग्नेय भागांत, सीमावर्ती भागात Chittagong डोंगराळ प्रदेश असून त्याच्या उत्तर, दक्षिण आणि पूर्वेला भारताची त्रिपुरा आणि मिझोराम ही राज्ये आहेत. Chittagong डोगराळ प्रदेशात रंगामती, बंदरबन अणि खाग्राचारी या तीन जिल्हयांचा समावेश होतो. २०११च्या जनगणनेनुसार या डोंगराळ प्रदेशातील एकूण लोकसंख्या १५,९८,२३१ इतकी असून त्यांतील ५३ टक्के भूमिपुत्र आहेत. या भूमिपुत्रांमध्ये बाम, चक, चकमा, खूमी, खयांग, लुशाइ, मारमा, मरो, त्रिपुरा, पांगखुआ, तांचांग्या इत्यादींचा समावेश होतो. वांशिक, भाषिक आणि धार्मिकदृष्ट्या हे भूमिपुत्र बांगलादेशात अल्पसंख्याक गटात मोडतात. ते प्रामुख्याने बौद्ध, हिंदू व ख्रिस्तीधर्मीय असून तिबेटो-बर्मन भाषा बोलतात. तर, बांगलादेशातील बहुसंख्य नागरिक इस्लामधर्मीय असून ते बंगाली भाषा बोलतात.

डोंगराळ प्रदेशातील भूमिपुत्र उदरनिर्वाहासाठी प्रामुख्याने शेतीवर अवलंबून आहेत. ब्रिटिशांच्या वासाहतिक धोरणांमुळे हे भूमिपुत्र प्रथम अडचणीत आले. चकमांचे राजे आणि ब्रिटिश गव्हर्नर जनरल यांच्यात १७८७मध्ये झालेला करार ब्रिटिशांनी १९व्या शतकात मोडला आणि Chittagong डोंगराळ प्रदेश तत्कालीन बंगाल प्रांताला जोडला. त्यानंतर तेथे विकासकामे चालू झाली, ऊर्जाप्रकल्प उभे राहिले आणि भूमिपुत्रांच्या जमिनीवर, मूलभूत अधिकारांवर गदा आली. भूमिपुत्रांच्या एकूण दोन-पंचमांश जमिनी बुडिताखाली गेल्या. सुमारे एक-तृतीयांश नागरिकांवर निर्वासित होण्याची वेळ आली. १९७१मध्ये बांगलादेशाची निर्मिती झाली. त्या काळात, या डोंगराळ प्रदेशात बांगलादेशाच्या लष्कराचा प्रभाव वाढला. लष्कराकडून स्थानिकांच्या मानवाधिकारांचे उल्लंघन मोठ्या प्रमाणावर झाले. १९७९ ते १९८४-८५ या कालावधीत बांगलादेशाच्या सरकारकडून सुमारे २ ते ४ लाख बंगाली-मुस्लिमांचे तेथे स्थलांतर करण्यात आले. त्यानंतर तेथे वांशिक, धार्मिक संघर्षाच्या घटना वाढल्या आणि तेथील सुमारे १ लाखावर भूमिपुत्रांनी (प्रामुख्याने चकमांनी) भारताच्या हद्दीत प्रवेश केला. चकमा निर्वसितांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न बांगलादेशाने केलेला असला तरी आजवर चकमांचे प्रश्न पूर्णपणे संपलेले नाहीत.

दरम्यान, १९९७मध्ये बांगलादेशाचे सरकार आणि भूमिपुत्रांचा राजकीय पक्ष यांनी वाटाघाटी व करार करून काही प्रश्नांवर तोडगा काढला. त्यात Chittagong डोंगराळ प्रदेशासाठी वेगळ्या मंत्रालयाची स्थापना, Chittagong प्रादेशिक परिषदेची स्थापना, जिल्हा परिषदांची स्थापना, भूमिपुत्रांच्या संस्थाचे सक्षमीकरण इत्यादी बाबींना प्राधान्य देण्यात आले. त्या नंतर भूमिपुत्रांच्या जमीनविषयक अडचणी सोडविण्याचे प्रयत्न करण्यात आले. जमीनविषयक व्यवस्थापनाचे अधिकार जिल्हा पातळीवरील परिषदांकडे सोपविण्यात आले. भूमिपुत्रांचे पुनर्वसन करण्यात आले. ज्यांच्या जमिनी बेकायदेशीररीत्या भाडेपट्ट्याच्या करारावर देण्यात आल्या होत्या ते करार रद्द करण्यात आले. भूमिहीन भूमिपुत्रांना जमिनी देण्यात आल्या. पण या प्रयत्नांनंतरही तेथील भूमिपुत्रांचे जमीनविषयक प्रश्न पूर्णपणे सुटलेले नाहीत, असे काही अभ्यासकांना आढळले. त्याबाबत प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नसल्याचेही अभ्यासकांनी नमूद केले आहे.

**जमीन आयोगाची स्थापना**

दरम्यान, भूमिपुत्रांचे जमीनविषयक विविध प्रश्न सोडविण्यासाठी 'जमीन आयोगा'ची स्थापना १९९९मध्ये करण्यात आली आणि त्या नंतर २००१मध्ये जमीन आयोग कायदाही करण्यात आला. असे असतानाही आयोगाचे कामकाज पुढे सरकू शकले नाही. कारण १९९७मध्ये झालेला करार आणि जमीन आयोग कायदा यांत ताळमेळ जमून आला नाही. आयोगाच्या अध्यक्षांना देण्यात आलेले अधिकार आणि आयोगाचे अपेक्षित कार्यक्षेत्र व निर्णयप्रक्रियेतील सहभाग या संदर्भात काही विवाद्य मुद्दे उपस्थित झाल्याने आयोगाचे कामकाज ठप्प झाले. आयोगाचे कामकाज चालविण्यासाठी अपेक्षित असलेल्या मनुष्यबळाची कमतरता हाही महत्त्वाचा मुद्दा ठरला. त्या नंतर २००१च्या कायद्यात बदल करण्याची मागणी प्रादेशिक परिषदेने लावून धरली होती. त्यात बदल करण्याचे सरकारने जुलै २०१३मध्ये मान्य केले. पण हे बदल अद्याप झालेले नाहीत. असे असतानाही भूमिपुत्रांच्या परंपरागत संस्था व भूमिपुत्रांमधील अन्य प्रमुखांनी भूमिपुत्रांच्या जमिनी मिळवण्यासाठी केलेले प्रयत्न उल्लेखनीय ठरतात, असे मत अभ्यासकांनी नोंदवले आहे.



**फिलिपिन्समधील विकासकामे आणि भूमिपुत्रांचा प्रश्न**

सुमारे ७ हजारांवर छोट्या छोट्या बेटांचा समावेश असलेल्या फिलिपिन्समध्ये अलीकडच्या काळात भूमिपुत्रांची नेमकी संख्या किती, याची आकडेवारी अभ्यासकांना उपलब्ध होऊ शकलेली नाही. पण १९९५मधील जनगणनेनुसार तेथील एकूण लोकसंख्येच्या सुमारे १७ टक्के म्हणजे १ कोटी २८ लाख इतकी भूमिपुत्रांची लोकसंख्या होती. फिलिपिन्समध्ये वांशिक व भाषिक भिन्नता असून अशा सुमारे ११० भिन्न गटांमधील नागरिकांचा भूमिपुत्रांमध्ये समावेश होतो. भूमिपुत्रांमध्ये Mindanao (Bangsa Moro), Luzon, Visayas इत्यादी वांशिक गट आहेत.

फिलिपिन्सच्या सरकारने १९८७मध्ये भूमिपुत्रांच्या हक्कांना मान्यता दिली. त्या नंतर भूमिपुत्रांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी तेथे राष्ट्रीय आयोगाचीही स्थापना करण्यात आली. त्यानुसार वारसाहक्काने भूमिपुत्रांना मिळालेल्या जमिनींबाबतचे अधिकार जपणे, त्यांचे सक्षमीकरण करणे, त्यांना स्वयंनिर्णयाचा अधिकार मिळणे, सामाजिक न्याय व मानवाधिकारांची जपणूक आणि सांस्कृतिक एकता कायम राखणे इत्यादींना प्राधान्य देण्यात आले. (विकासाच्या संदर्भात) भूमिपुत्रांना विविध घडामोडींची माहिती देणे आणि त्यांची मान्यता मिळवणे, हे फिलिपिन्सच्या सरकारने कायद्याने बंधनकारक केले आहे. विशेषतः, खाणकामाबाबत निर्णय घेताना भूमिपुत्रांना संपूर्ण माहिती देऊन त्यांची मान्यता मिळवणे आवश्यक आहे. राष्ट्रीय आयोगावर सरकारतर्फे नेमणुका केल्या जात असल्याने भूमिपुत्रांची मान्यता मिळवणे हे अनेकदा 'घडवून' आणले जाते, आणि अशा बाबी एक औपचारिकता बनून राहतात, असे मतही संबंधितांकडून मांडले जाते. तरीदेखील अशा प्रयत्नांमधून भूमिपुत्रांचे हित काही ना काही प्रमाणात जपले जाते, हेदेखील लक्षात घेणे गरजेचे आहे. बांगलादेश आणि फिलिपिन्स येथील सरकारांनी भूमिपुत्रांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी उचललेली पावले जगभरात महत्त्वाची मानली गेली आहेत. भारताने ईशान्य भागातील भूमिपुत्रांसाठी आणि मलेशियाने तेथील भूमिपुत्रांसाठी अशाच प्रकारची काही पावले उचलली आहेत. या संदर्भातील चारही देशांमधील काही मुद्दे पुढील तक्त्यांमध्ये मांडले आहेत.

## बांगलादेश व फिलिपिन्स : भूमिपुत्रांचे प्रश्न आणि प्रयत्नांच्या दिशा

| विषय | फिलिपिन्स (विविध बेटांवरील भूमिपुत्र) | बांगलादेश (Chittagong डोंगराळ प्रदेश) |
|---|---|---|
| ●स्वयंनिर्णयाचा अधिकार व स्वायत्तता | ●प्रादेशिक स्वायत्ततेसाठी घटनात्मक तरतूद | ●डोंगराळ प्रदेशासाठी विशेष मंत्रालय, प्रादेशिक परिषदा आणि भूमिपुत्रांच्या परंपरागत संस्था |
| ● भूमिपुत्रांच्या परंपरागत संस्थांना बळकटी | ●पूर्वीपासून वास्तव्यास असणा-या जमातींच्या कार्यक्षेत्रास व प्रभावास मान्यता | ●भूमिपुत्रांच्या परंपरागत संस्था, संस्थाप्रमुख आणि कारभारी यांना अधिकार |
| ●भूमिपुत्रांवार परिणाम करणा-या बाबींसंदर्भातील निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग | ●प्रादेशिक स्वायत्ततेसाठी घटनात्मक तरतूद | ●डोंगराळ प्रदेशासाठी विशेष मंत्रालय, त्यात भूमिपुत्रांना प्रतिनिधित्व, जमीन आयोगात भूमिपुत्रांचे प्रतिनिधित्व, न्यायविषयक बाबींमध्येही भूमिपुत्रांना प्रतिनिधित्व |
| ●भूमिपुत्रांना जमीनविषयक अधिकार आणि त्या संबंधी त्यांचे रूढीपरंपरेनुसार पूर्वापार चालत आलेले अधिकार यांना मान्यता | ● भूमिपुत्रांसाठी घटनात्मक तरतूद, राष्ट्रीय आयोगाची महत्त्वपूर्ण भूमिका, जमीनविषयक बाबींसंदर्भात प्रमाणपत्र, प्रादेशिक स्वायत्तता | ● भूमिपुत्रांचे परंपरागत चालत आलेले जमीनविषयक अधिकारांना घटनात्मक दृष्ट्या मान्यता तसेच त्यांच्या संस्था आणि न्यायालये यांनाही मान्यता |

या दोन्ही देशांसंदर्भात अभ्यासकांनी म्हटले आहे की, फिलिपिन्समध्ये भूमिपुत्रांचे निर्णयप्रक्रियेतील स्थान असावे तेवढे बळकट नाही. तर बांगलादेशात भूमिपुत्रांना अधिकार देताना व त्याबाबतची अंमलबजावणी करताना राज्यशासनाचा पुरेसा पाठिंबा मिळेल याची तरतूद नाही.



## भारत आणि मलेशिया : भूमिपुत्रांचे प्रश्न आणि प्रयत्नांच्या दिशा

| विषय | भारत (ईशान्येकडील राज्ये) | मलेशिया (साबाह आणि सारावाक) |
|---|---|---|
| ●स्वयंनिर्णयाचा अधिकार व स्वायत्तता | ●नागालँड आणि मिझोराम या राज्यांसाठी घटनेनुसार विशेष उपाययोजना ●घटनेनुसार स्वायत्त जिल्हे आणि प्रादेशिक परिषदा | ●साबाह आणि सरावाक या प्रांतांसाठी विशेष घटनात्मक तरतूद |
| ●स्थानिक संस्था | ●स्थानिक संस्थांच्या प्रमुखपदासाठी जिल्हा परिषदांमार्फत नियुक्ती | ●जमीन व्यवस्थापनविषयक व सामाजिक न्याय या संदर्भात परंपरागत व्यवस्थेतील प्रमुखांची महत्त्वाची भूमिका |
| ●निर्णयप्रक्रियेतील सहभाग | ●घटनात्मक तरतुदीनुसार सरकारी पदांवर आणि विधिमंडळात भूमिपुत्रांना आरक्षण | ●जमीनविषयक बाबीं-संदर्भात निर्णय घेण्याच्या दृष्टीने विशेष कायदेशीर तरतूद |
| ●भूमिपुत्रांबाबतच्या कायद्यांसंदर्भात विशेष सल्लामसलतीचा अधिकार | ●नागालँड आणि मिझोरामबाबत विशेष उपाययोजना, कायदेमंडळात विशेष स्थान | ●कायदेशीर विशेष तरतूद |
| ●जमीनविषयक दावे, हक्क यांसाठी न्याय मिळण्याबाबत | ● भूमिपुत्रांसाठी विशेष न्यायालये, कायदेमंडळाची व प्रशासनाची विशेष भूमिका स्वायत्त जिल्हा व प्रादेशिक मंडळांना अधिकार | ●साबह आणि सारावक इथे उच्च न्यायलये, स्थानिक न्यायालयांचीही महत्त्वाची भूमिका |

अर्थात, भूमिपुत्रांच्या संदर्भात संयुक्त राष्ट्रसंघाने घेतलेल्या भूमिकेचे समर्थन या देशांनी कृती करून प्रश्न सोडविण्याच्या दिशेने वाटचाल केली आहे, असे यावरून दिसून येते. ■■

राजकीय

# अण्वस्त्रे, पर्यावरण आणि जागतिक सुरक्षा

मध्यपूर्वेतील देशांमधील घडामोडी जगाच्या राजकीय इतिहासात येत्या काळात महत्त्वाच्या ठरू शकतात, अशी चर्चा अलीकडच्या काळात अभ्यासकांमध्ये घडून येते आहे. या चर्चेला एक बाजू आंतरराष्ट्रीय राजकारणाची, मध्यपूर्वेतील राजकीय अस्थिरता आणि अण्वस्त्रांमुळे / अणुऊर्जेमुळे उद्‌भवू शकणा-या धोक्यांची आहे. त्याचबरोबर वातावरणातील बदलांमुळे वाळवंटीकरणाचा उद्‌भवलेला धोका आणि पाण्याचा गंभीर बनत असलेला प्रश्न हे मुद्देही या चर्चेत महत्त्वाचे ठरत आहेत. पाण्याचा प्रश्न गंभीर रूप धारण करत असल्यामुळे समुद्रातील खारे पाणी पिण्यायोग्य/ वापरायोग्य बनविण्यासाठी मध्यपूर्वेकडील देशांना लागणा-या ऊर्जेचा प्रश्नही विचारात घ्यावा लागेल, असे म्हटले जाते आहे. केवळ मध्यपूर्वेतच नव्हे तर जगभरातच ऊर्जेची गरज व मागणी वाढते आहे, ही वस्तुस्थिती लक्षात घेणे गरजेचे आहे. जीवाश्मांपासून मिळणा-या इंधनावर आणि ऊर्जेवर अवलंबून राहण्यापेक्षा अणुऊर्जेचा वापर करण्याकडे अनेक देशांचा कल अलीकडच्या काळात वाढतो आहे, ही बाब इथे लक्षात घेण्यासारखी आहे. अणुऊर्जानिर्मितीच्या प्रक्रियेत अणुबॉंबच्या निर्मितीची बीजे रोवली जाऊ शकतात, त्यामुळे सुरक्षाविषयक प्रश्न निर्माण होतात. म्हणून, अणु-ऊर्जानिर्मिती हा जगभरात वादचर्चेचा विषय बनला आहे. 'अण्वस्त्रविरोधी दिना'च्या (६ ऑगस्ट) निमित्ताने मध्यपूर्वेतील या विषयाशी संबंधित घडामोडी जाणून घेणे उद्‌बोधक ठरावे.

ऊर्जेची वाढती गरज पूर्ण करण्यासाठी अणुऊर्जेवर भर देण्यात येत असताना अणुतंत्रज्ञानाचे नागरी वापरांसाठी केले जाणारे उपयोजन आणि अण्वस्त्रे तयार करण्यासाठी केला जाणारा वापर या दोन बाबींमध्ये फरक आहे, हे समजून घेतले पाहिजे. अणुऊर्जानिर्मितीसाठी कार्यान्वित करण्यात आलेल्या जुन्या अणुभट्ट्यांचा वापर कोणत्याही प्रकारे अण्वस्त्रनिर्मितीसाठी केला जाऊ नये, याची विशेष दक्षता संबंधितांनी घेणे आवश्यक आहे, या मुद्द्यावर तज्ज्ञांकडून विशेष भर दिला जातो आहे.



आजही जगाला अण्वस्त्रांचा धोका आहे, असे अभ्यासकांना वाटते कारण आजमितीस जगातील अण्वस्त्रधारी देशांकडे असलेली सुमारे २० हजार अण्वस्त्रे या वसुंधरेला अनेकवेळा नष्ट करू शकतील इतक्या प्रचंड क्षमतेची आहेत. अमेरिका आणि रशिया या देशांमधील काही अण्वस्त्रे नष्ट करण्यात आली असली तरी अनेक देश अण्वस्त्रधारी आहेत. यांत अमेरिका, रशिया, ब्रिटन, फ्रान्स, चीन, पाकिस्तान, भारत, इस्त्रायल, उत्तर कोरिया या देशांचा समावेश आहे. या शिवाय, अनेक देशांकडे क्षेपणास्त्रे आहेत. देशाची सुरक्षा जपणे आणि वेळप्रसंगी अंतराळात युद्ध करण्यासाठी शस्त्रसज्ज असणे ही राजकीय धोरणेही इथे विचारात घ्यावी लागतात. अशा परिस्थितीत मध्यपूर्वेतील देश अण्वस्त्रांच्या चढाओढीत उतरले तर ते धोकादायक ठरू शकते. मध्यपूर्वेतील इराण, टर्की, सौदी अरेबिया, कतार, कुवेत हे देश अणुऊर्जेसाठी प्रयत्नशील आहेत. शिवाय, येमेन, जॉर्डन आणि इजिप्त या देशांनी अणुऊर्जानिर्मितीत रस दाखवला आहे कारण या देशांना आपली ऊर्जेची गरज भागविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर ऊर्जा आयात करावी लागते. दरम्यान, मध्यपूर्वेकडील देशांमध्ये अस्थिरता असून त्यावर मात करण्याचे प्रयत्न चालू आहेत. अशा वेळी नागरिकांच्या सामाजिक, राजकीय जीवनात त्याचे पडसाद उमटू शकतात. परिणामी, देशांचा युद्धखोरीकडे असलेला कल वाढू शकतो, अशी भीती व्यक्त करण्यात येते.

जागतिकीकरणाच्या व उदारीकरणाच्या या काळात आर्थिक विकास हा सर्वच देशांसाठी प्राधान्यक्रमावर असणारा विषय आहे. विकासप्रक्रियेला गती देण्यासाठी ऊर्जा आवश्यक आहे आणि ऊर्जेची गरज भागविण्यासाठी विविध देशांच्या सरकारांचा कल अणुऊर्जेकडे झुकतो आहे. स्वाभाविकच अणुऊर्जा तयार करण्यासाठी लागणारी साधनसामग्री मिळवण्याचे प्रयत्न देशांकडून करण्यात येतात. अशी साधनसामग्री दहशतवादी गटांच्या हाती लागली तर जगाची सुरक्षितता धोक्यात येते. शिवाय, अणुऊर्जा निर्माण करतानाच अण्वस्त्रसज्ज होण्याची ईर्षाही राजकीय नेतृत्वामध्ये प्रबळ बनू शकते. परिणामी, आक्रमकता व युद्धखोरी या प्रवृत्तीही प्रबळ बनतात. देशोदेशींची सामाजिक, राजकीय, आर्थिक परिस्थितीही याबाबत महत्त्वाची भूमिका बजावते. म्हणूनच अण्वस्त्रांचा धोका आजही टळलेला नाही.

**अण्वस्त्रे आणि पर्यावरण**

अण्वस्त्रांचा धोका जसा जागतिक पातळीवर आहे तसाच पर्यावरणविषयक समस्यांचा धोकाही वैश्विक पातळीवर आहे. त्यामुळे या दोहोंबाबतची एकत्रित चर्चाही काही अभ्यासकांनी केली आहे. तसेच, या दोहोंमधील साधर्म्य वा फरक शोधण्याचा प्रयत्न केला जातो आहे. एखाद्या छोट्या गटाकडून -हस्वदृष्टीने, घाईगडबडीने घेतलेल्या निर्णयामुळे अण्वस्त्रांचा धोका संभवतो. मात्र, त्याचे परिणाम अणुबॉंबचा वापर जिथे केला जातो तिथेच म्हणजे स्थानिक पातळीवर सर्वांत जास्त प्रमाणात जाणवतात. तर, जागतिक पातळीवर (उदाहरणार्थ, जागतिक तापमानवाढ) कालौघात हळूहळू घडून येणा-या अनेकविध घटना वा बाबींमुळे पर्यावरणविषयक समस्यांचा धोका उद्‌भवतो आणि या धोक्याचे परिणामही अनेकदा स्थानिक पातळीवर अधिक प्रमाणात दिसून येतात. किरणोत्सर्गामुळे अण्वस्त्रांचे परिणाम दीर्घकालीन व मानवजातीसाठी विघातक असे ठरू शकतात. तसेच, पर्यावरणविषयक प्रश्नांमुळेही मानवजात मोठ्या अडचणीत येऊ शकते. अण्वस्त्रांचा वापर करावा की नाही याचा निर्णय प्रामुख्याने त्या त्या वेळच्या प्रादेशिक पातळीवरील घडामोडींवर अवलंबून असतो. म्हणजे, एका प्रकारे ती कारणे/घडामोडी स्थानिक असतात. पर्यावरणविषयक प्रश्नांबाबतही अनेकदा अनेक कारणे/घटना स्थानिक असतात. स्थानिक पातळीवरील प्रदूषणामुळे जागतिक पातळीवरील प्रदूषण होत असते. त्यामुळे जागतिक पातळीवरील प्रदूषण वाढून जागतिक तापमानवाढ होते.

अण्वस्त्रांचा वापर करण्यात आला तर त्याचे पर्यावरणावर कसकसे विपरीत परिणाम होतील, याचाही ऊहापोह संबंधित अभ्यासांमध्ये करण्यात येतो आहे. अण्वस्त्रांचा स्फोट घडवून आणला तर वायू, धूर, खडक, किरणोत्सारी घटक व अन्य कचरा यांचे मोठे ढीग वातावरणात जमतील. त्यामुळे जागतिक पातळीवर अचानक विपरीत बदल जाणवण्याची शक्यता आहे. अशा ढिगांमुळे सूर्यकिरण पृथ्वीवर पोहचू शकणार नाहीत. परिणामी, पृथ्वीवर काही महिने सर्वत्र प्रचंड थंडी (nuclear cooling) पडू शकेल. शिवाय, मानवी आरोग्यास अपायकारक अशा अतिनील किरणांचा प्रभाव रोखणा-या ओझोनच्या थराला छिद्र पडेल.



औद्योगिकीकरणामुळे आधीच गजबजलेल्या शहरांवर बॉंब टाकण्यात आला तर धुराचे लोट आणि आगीचे लोळ वातावरणात पसरतील. त्यामुळे होणारी हानी व पर्यावरणीय दुष्परिणाम हा आणखी एक महत्त्वाचा विषय ठरतो. अण्वस्त्रांच्या वापरामुळे होणारी पर्यावरणीय हानी लक्षात घेतली तर मध्यपूर्वेतील राजकीय, सामाजिक तसेच ताज्या पर्यावरणीय घडामोडींचा अधिक बारकाईने व सर्वंकष अभ्यास व्हायला हवा, असे मत अभ्यासक मांडतात. मध्यपूर्वेतील वांशिक, धार्मिक, राजकीय व सामाजिक संघर्ष इतिहासकाळापासून आहे. त्यातच जागतिकीकरणामुळे तेथे असमान विकास घडून आलेला आहे. शिवाय, जबरदस्तीने घुसखोरी करून आपले वर्चस्व वाढवण्याचा प्रयत्न तेथे केव्हाही होऊ शकतो. त्यामुळे आपल्या भूप्रदेशाची अखंडता राखणे हा तेथील राजकारणातील एक महत्त्वाचा मुद्दा ठरतो. अरब जगतात अलीकडेच झालेल्या 'जस्मिन' क्रांतीमुळे तेथील नागरी संघर्षाची बाजूही जगापुढे आली आहे. त्यामुळे तेथील कोणताही संघर्ष अण्वस्त्रे वापरण्याच्या शक्यतेकडे जाऊ नये याची विशेष काळजी घेण्यात यावी, असे प्रतिपादन केले जाते.

जागतिक तापमानवाढीमुळे घडून येणा-या पर्यावरणीय बदलांचा अभ्यास मध्यपूर्वेतील देशांच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचा ठरतो. विशेषतः, पर्जन्यमानातील बदलांमुळे नाइल, युफ्रेटिस, टिग्रिस आणि जॉर्डन या नद्यांच्या प्रवाहावर परिणाम झाल्यास तेथे पाण्याचा प्रश्न गंभीर रूप धारण करू शकतो. तसेच, समुद्रातील पाण्याची पातळी वाढल्यास गाझा परिसराला धोका निर्माण होण्याची शक्यता वाढते. पाणी हा मध्यपूर्वेत अतिशय महत्त्वाचा विषय असून पाणीविषयक धोरण हे संवेदनशील समजले जाते. अशा परिस्थितीत तेथे राजकीय, सामाजिक, आर्थिक वा पर्यावरणीय प्रश्न उद्‌भवल्यास संघर्ष टोकाला जाऊ शकतो. त्याच्या जोडीनेच अन्नसुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण होऊन अस्थिरतेत भरच पडू शकते. अशा परिस्थितीत मध्यपूर्वेतील देश आपापले लष्करी सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न करण्याची शक्यता वाढते. अशा कारणांमुळे, अण्वस्त्रनिर्मितीच्या व युद्धखोरीची दिशेने वाटचाल झाली तर ते संपूर्ण जगासाठी धोक्याचे ठरू शकते. तसे घडणार नाही, अशी आशा धरण्यापलीकडे आपल्या हातात काय आहे? ■■

उद्योग

# महाराष्ट्रातील लघुउद्योग : स्थिती आणि गती

अलीकडील साधारणपणे दीड दशकाच्या कालावधीदरम्यान महाराष्ट्रातील लघुउद्योगांची स्थिती-गती कशी राहिलेली आहे, याचा आढावा घेण्याचा प्रयत्न या ठिकाणी केलेला आहे. दरवर्षीच्या ऑगस्ट महिन्यात साज-या केल्या जाणा-या लघुउद्योग दिनाच्या पार्श्वभूमीवर हे समालोचन उपयुक्त आणि संयुक्तिक ठरावे. आपल्या देशातील प्रचलीत व्याख्येनुसार, वस्तुनिर्माण उद्योगक्षेत्रात कार्यरत असणा-या ज्या उद्योगघटकांतील यंत्रसामग्रीमध्ये २५ लाखांपासून पाच कोटी रुपयांपर्यंत गुंतवणूक केलेली असते अशा उद्योगघटकांचा निर्देश 'लघुउद्योग' म्हणून केला जातो. औद्योगीकरणाच्या वाढविस्तारात लघुउद्योगांच्या क्षेत्रातील उद्योगव्यवसाय घटकांची भूमिका ही नेहेमीच महत्त्वाची राहिलेली आहे. आपल्या देशातील विविध प्रांतांत हाच अनुभव येतो. लघुतम, लघु आणि मध्यम उद्योगघटकांच्या वर्गात समाविष्ट असणा-या नोंदणीकृत वस्तुनिर्माण व सेवा उद्योगव्यवसायघटकांची एक राष्ट्रस्तरीय पाहणी आपल्या देशात २००६-०७ या वर्षात करण्यात आलेली होती. अशा प्रकारची ती चौथी पाहणी होती. आपल्या देशातील लघुतम, लघु आणि मध्यम आकारमानाच्या उद्योगव्यवसायघटकांमध्ये निर्माण झालेल्या एकंदर रोजगारात लघुउद्योगांतील रोजगाराचा हिस्सा २५.१७ टक्के इतका असल्याचे वास्तव त्या पाहणीने पुढ्यात मांडले (या वर्गातील एकंदर रोजगारामध्ये लघुतम उद्योगव्यवसायांचा वाटा सिंहाचा, म्हणजे, एकुणांत ७०.१९ टक्के इतका होता, ही वस्तुस्थितीही त्या अहवालाने उजेडात आणली). लघुउद्योग व्यवसायघटकांच्या वर्गात दर उद्योगघटकामागे सरासरीने ३०.६२ व्यक्तींना तेव्हा रोजगार उपलब्ध होत असल्याचे ती आकडेवारी सांगते. लघुउद्योगांत निर्माण होणा-या ठोकळ उत्पादिताशी त्या क्षेत्रात निर्माण होणा-या रोजगाराचे प्रमाण बघितले तर, दर एक कोटी रुपयांच्या ठोकळ उत्पादितामागे सरासरीने ७.३५ कामगार असे ते गुणोत्तर तेव्हा होते. लघुतम, लघु आणि मध्यम



आकारामानाच्या उद्योगव्यवसाय क्षेत्रात रोजगार निर्मिती करण्यात त्या वेळी आपल्या देशातील तामिळनाडू, गुजरात आणि महाराष्ट्र ही राज्ये आघाडीवर असल्याचे त्या पाहणीने दर्शविले. या क्षेत्रातील एकंदर रोजगारामध्ये या तीन राज्यांचा वाटा त्या वर्षात अनुक्रमे १५.३२ टक्के, १३.३७ टक्के आणि ११.७० टक्के असा होता. अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील लघु, लघुतम आणि मध्यम उद्योगविश्वाचे चित्र वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण दिसते. देशभरात या उद्योगगटात कार्यरत असलेल्या एकंदर उद्योगव्यवसाय घटकांपैकी केवळ ५.५४ टक्के इतकेच व्यवसायघटक महाराष्ट्रात कार्यरत असताना या उद्योगगटातील एकंदर रोजगारामध्ये मात्र महाराष्ट्राचा वाटा ११.७० टक्क्यांचा असावा, ही बाब लक्षणीय ठरते. म्हणजेच, अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील लघुउद्योग हे अधिक रोजगारसघन असल्याचे ती पाहणी सांगते.

इथे एक बाब नीट ध्यानात घेणे गरजेचे आहे. २००६-०७ या वर्षात करण्यात आलेल्या राष्ट्रस्तरीय पाहणीदरम्यान लघुतम, लघु व मध्यम आकारमानाच्या उद्योगव्यवसायांच्या गटातील केवळ नोंदणीकृत उद्योगघटकांचाच अंतर्भाव करण्यात आलेला होता. साहजिकच, १९९८ आणि २००५ या दोन वर्षी आपल्या देशात करण्यात आलेल्या आर्थिक सर्वेक्षणांद्वारे हाती येणारी माहिती ही २००६-०७ या वर्षातील पाहणी अभ्यासापेक्षा अधिक व्यापक स्वरूपाची असावी हे स्वाभाविक ठरते. त्याला कारणही तसेच आहे. आर्थिक सर्वेक्षणात आपल्या देशातील नोंदणीकृत तसेच अ-नोंदणीकृत अशा सर्व प्रकारच्या उद्योगव्यवसायघटकांचा समावेश केलेला असतो. खेदाची बाब म्हणजे २००५ सालानंतर घेण्यात आलेल्या आर्थिक सर्वेक्षणाची आकडेवारी अजूनही उपलब्ध होत नसल्याने २००५ सालासाठीच्या आर्थिक सर्वेक्षण आकडेवारीवरच आपल्याला तहान भागवावी लागते. लघुतम, लघु आणि मध्यम उद्योगव्यवसायघटकांची २००६-०७ या वर्षातील राष्ट्रीय स्तरावरील पाहणी आणि २००५ या वर्षासाठीचे आर्थिक सर्वेक्षण या दोन माहितीस्त्रोतांद्वारे हाती येणा-या सांख्यिकमध्ये लक्षणीय फरक असल्याचे ध्यानात येते. आर्थिक सर्वेक्षणांसारखे उपक्रम आपल्या देशात अधिक नियमितपणे घेतली जाण्याची निकडच ही तफावत जणू

अधोरेखित करते. या वस्तुस्थितीचे केवळ एक उदाहरणही वानगीदाखल पुरे. २००६-०७ या वर्षासाठीच्या राष्ट्रीय पाहणीनुसार, आपल्या देशातील नोंदणीकृत लघुतम, लघु व मध्यम उद्योगघटकांमध्ये एकंदर ८० लाख ८२ हजार श्रमिकांना रोजगार उपलब्ध झालेला होता. परंतु, २००५ साली घेण्यात आलेल्या आर्थिक सर्वेक्षणाच्या आकडेवारीनुसार लघुतम, लघु आणि मध्यम उद्योगव्यवसायांच्या क्षेत्रातील एकंदर रोजगार भरतो ९७ लाख ८० हजार इतका. २००६ ते २०१२ या संपूर्ण कालावधीदरम्यान देशी ठोकळ उत्पादनवाढीचा वार्षिक सरासरी दर चांगल्यापैकी सशक्त राहिला. परंतु, आर्थिक वाढविकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या गणल्या जाणा-या नेमक्या याच कालावधीदरम्यान आपल्या देशातील उद्योगक्षेत्रात नेमक्या कशा प्रकारची पुनर्रचना घडून आली, परिणामी उद्योगक्षेत्रातील रोजगाराच्या आकृतिबंधात नेमके काय बदल कसे व किती झाले यांबाबतची कोणतीही वास्तवाधारित आकडेवारी उपलब्ध होत नाही. देशाच्या ठोकळ उत्पादितामध्ये बिगर शेतीक्षेत्राचा जो वाटा आहे त्यांत भारतीय अर्थव्यवस्थेतील असंघटित किंवा/आणि अ-नोंदणीकृत उद्योगव्यवसायघटकांचा हिस्सा जवळपास निम्मा आहे. केवळ इतकेच नाही तर, आपल्या देशातील एकंदर बिगर शेती रोजगारापैकी तब्बल ८४ टक्के रोजगार हा याच असंघटित आणि/अथवा अ-नोंदणीकृत उद्योगव्यवसायघटकांमध्ये सामावलेला आहे. हे चित्र पाहता, भारतीय अर्थव्यवस्थेच्या स्थिती-गतीबाबत कोणतेही विवेचन करताना अथवा तिच्या वाटचालीवर प्रकाश टाकणारी कोणतीही आकडेवारी सिद्ध करताना या औरसचौरस अ-नोंदणीकृत आणि/किंवा असंघटित क्षेत्राचे वास्तव प्रतिबिंब संबंधित आकडेवारीमध्ये उमटणे केवळ महत्त्वाचेच नव्हे तर अनिवार्यच ठरते. आपल्या देशातील रोजगारासंदर्भात राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेने २०११-१२ या वर्षासाठी तयार केलेल्या सर्वेक्षणातील आकडेवारीनुसार, भारतीय अर्थव्यवस्थेतील एकंदर बिगर शेती रोजगारापैकी केवळ १८ टक्के रोजगार काय तो नियमित स्वरूपाचा, 'पगारदार कर्मचारी' म्हणून ज्याची गणना करता येईल अशा प्रकारचा दिसतो. बाकी उरलेला सर्व बिगर शेती रोजगार हा एकतर स्वयंरोजगार तरी आहे अथवा तो जुजबी, तात्पुरता, हंगामी स्वरूपाचा रोजगार म्हणून तरी गणावा लागतो.



किंबहुना, महाराष्ट्रातील लघुउद्योग क्षेत्रात समाविष्ट असणा-या उद्योगव्यवसायघटकांच्या चलनवलनात १९९८ ते २००५ या दरम्यानच्या काळात लक्षणीय स्वरूपाचे काही बदल झाल्याचे आपल्याला दिसते. लघुउद्योगांची राज्यातील संख्या आणि लघुउद्योग क्षेत्रात राज्यात निर्माण झालेला एकूण रोजगार या दोहोंतही १९९८ आणि २००५ या दरम्यानच्या काळात लक्षणीय घट घडून आल्याचे संबंधित आकडेवारी सांगते. राज्यात कार्यरत असणा-या वस्तुनिर्माण उद्योगांतील रोजगारात या काळादरम्यान ८.९७ टक्क्यांची घसरण झाली. १९९८ साली २८ लाख ७ हजारांच्या घरात असणारा वस्तुनिर्माण उद्योगांतील एकंदर रोजगार २००५ साली २५ लाख ५५ हजारांपर्यंत खाली आला. सर्व आकारमानांच्या उद्योगांत हाच कल दिसला. साहजिकच, लघुउद्योगांचा पोटविभागही त्याला अपवाद नव्हता. मात्र, १९९८ ते २००५ या कालावधीदरम्यान महाराष्ट्राच्या लघुउद्योग क्षेत्रातील एकंदर रोजगारात घडून आलेली घट ही अन्य आकारमानांच्या उद्योगघटकांतील रोजगारात झालेल्या घसरणीपेक्षा सर्वाधिक तीव्र होती. राज्याच्या लघुउद्योग क्षेत्रातील एकंदर रोजगार ४ लाख ८४ हजारांवरून घसरून २ लाख ७० हजारांवर आला. ही घट थोडीथोडकी नाही तर चांगली ४४.१४ टक्क्यांची भरते. लघुउद्योग व्यवसायघटकांच्या एकूण संख्येतही याच काळात ४३.५० टक्क्यांनी घसरण होऊन ती संख्या २२ हजार ४७० वरून १२ हजार ६९५ येऊन ठेपली. मात्र, नेमक्या याच काळात राज्यातील लघुतम उद्योगांच्या पोटविभागात मात्र सर्वाधिक वाढ अनुभवास आली. श्रमिकांची संख्या १ ते १० पर्यंत असणा-या उद्योगघटकांचा अंतर्भाव लघुतम व्यवसायघटकांच्या पोटविभागात केला जातो. परिणामी, राज्यातील वस्तुनिर्माण उद्योगक्षेत्रातील दर व्यवसायघटकामागील रोजंदारीचा सरासरी आकडा ४.१९ श्रमिकांवरून ३.३२ श्रमिकांपर्यंत खाली आला. दर उद्योगघटकामागील सरासरी श्रमिकांच्या संख्येत १९९८ आणि २००५ या दोन कालबिंदूदरम्यान घडून आलेली ही घसरण सर्व आकारमानांच्या उद्योगांमध्ये दृग्गोचर झाली. परंतु, लघुउद्योगांच्या पोटविभागात मात्र तुलनेने सर्वांत कमी, म्हणजे, दर उद्योगघटकामागे २१.५५ श्रमिकांवरून २१.३१ श्रमिकांपर्यंत घसरण घडून आल्याचे ही आकडेवारी दर्शविते.

राज्यातील लघुउद्योग क्षेत्रात १९९८ ते २००५ या काळात घडून आलेल्या घडामोडी उत्साहवर्धक नसल्याचे चित्र एकीकडे उभरून येत असले तरी, राज्याच्या निरनिराळ्या जिल्ह्यांत वेगवेगळ्या प्रकारच्या उत्पादनप्रकारांत सक्रिय असणा-या लघुउद्योगांच्या कामगिरीत १९९८ ते २००५ या दरम्यान काय बदल घडून आले हे अभ्यासणे दुसरीकडे रोचक ठरते. वस्तुनिर्माण उद्योगांच्या राज्यातील स्थानांकनाचा नकाशा बघितला तर मुंबई, ठाणे आणि पुणे हे तीन जिल्हे सतत बिनीवर राहत आल्याचे स्पष्ट दिसते. या चार जिल्ह्यांच्या खालोखाल दुस-या फळीत येतात ते नागपूर, नाशिक, अहमदनगर, औरंगाबाद, सोलापूर आणि कोल्हापूर हे जिल्हे. स्थानांकनाच्या याच आकृतिबंधाची पुनरावृत्ती लघुउद्योग व्यवसायघटकांच्या पोटविभागातही झालेली असल्याचे संबंधित आकडेवारी आपल्याला सांगते. मात्र, या पोटविभागात आघाडीवर दिसतो तो ठाणे जिल्हा. राज्यातील एकंदर लघुउद्योगांपैकी ३३.४९ टक्के लघुउद्योग १९९८ सालासाठीच्या आकडेवारीनुसार एकट्या ठाणे जिल्ह्यामध्ये एकवटलेले होते. तर, लघुउद्योगांत राज्यभरात निर्माण झालेल्या एकूण रोजगारापैकी ३४.६१ टक्के रोजगार हा ठाण्यात केंद्रीत झालेला होता. लघुउद्योगांचे आणि त्यांत रोजंदारी मिळालेल्यांचे असे सर्वाधिक केंद्रीकरण झालेला तेव्हा महाराष्ट्रातील ठाणे हा एकमेव जिल्हा होता. परंतु, २००५ सालच्या आकडेवारीनुसार दिसणारे चित्र वेगळे होते. ठाणे जिल्ह्यात व्यवसाय थाटणा-या लघुउद्योगांचे राज्यातील एकंदर लघुउद्योगांशी असलेले प्रमाण १९९८ ते २००५ या कालावधीमध्ये घसरून २३.७२ टक्क्यांवर आलेले होते. तर, ठाणे जिल्ह्यातील लघुउद्योगांमध्ये रोजंदारी मिळालेल्या श्रमिकांचे राज्यभरातील लघुउद्योगांमध्ये रोजीरोटी कमावणा-या एकंदर श्रमिकांशी असलेले प्रमाणही २४.८२ टक्क्यांपर्यंत घसरलेले दिसले. दुसरीकडे, याच काळात पुढे सरकलेला दिसतो तो पुणे जिल्हा. पुणे जिल्ह्यात कार्यरत असणा-या लघुउद्योगांचे राज्यातील एकंदर लघुउद्योगांमध्ये असणारे प्रमाण १९९८ ते २००५ या काळात ७.७३ टक्क्यांवरून वाढून ११.६३ टक्क्यांवर पोहोचले. तर, पुणे जिल्ह्यातील लघुउद्योगांमध्ये काम करणा-या श्रमिकांचे राज्यभरातील लघुउद्योग क्षेत्रात कार्यरत असणा-या श्रमिकांशी असलेले



प्रमाणही त्याच दरम्यान ११.६३ टक्क्यांवरून १२.२२ टक्क्यांपर्यंत उंचावलेले दिसून आले. म्हणजेच, महाराष्ट्रातील लघुउद्योग क्षेत्राची १९९८ ते २००५ या कालावधीदरम्यान घडून आलेली पुनर्रचना रोजगारात्मक आणि भौगोलिक अशा दुहेरी स्वरूपाची होती. राज्यातील औद्योगिक रोजगारात १९९८ ते २००५ या काळात जी घसरण घडून आली तिला ठाणे जिल्हाही अपवाद नव्हता. फरक इतकाच की, ठाणे जिल्ह्यातील लघुउद्योगांमधील रोजगार १९९८ ते २००५ या काळात १ लाख ६७ हजारांवरून दाणकन घसरला आणि ६७ हजार ७५वर येऊन बसला. परंतु, तरीही लघुउद्योगांमधील रोजगाराचा विचार केला तर राज्यभरात ठाण्यातील लघुउद्योगांमध्येच सर्वाधिक रोजगार सामावलेला होता. महाराष्ट्रातील लघुउद्योगांमध्ये २००५ साली एकंदर २ लाख ७० हजार श्रमिक रोजीरोटी कमावत होते. लघुउद्योगांमधील रोजगारासंदर्भात राज्यात तेव्हा आघाडीवर असलेले अन्य जिल्हे म्हणजे मुंबई (एकूणांत हिस्सा २०.२९ टक्के), कोल्हापूर (तौलनिक हिस्सा ६.७० टक्के), नाशिक (लघुउद्योग रोजगारातील हिस्सा ५.६९ टक्के), सोलापूर (एकूण लघुउद्योग रोजगारातील वाटा ४.९२ टक्के) आणि नागपूर (एकूणांत हिस्सा ४.५३ टक्के).

राज्यातील लघुउद्योगांमधील रोजगाराचा आकृतिबंध आणि लघुउद्योगघटकांचे जिल्हावार स्थानांकन यांत १९९८ ते २००५ या काळादरम्यान जे बदल घडून आले त्यांचा आढावा आपण येथवर घेतला. आता, वस्तुनिर्माण उद्योगांच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या लघुउद्योगांचे ते उत्पादन करत असलेल्या उत्पादनप्रकारांनुसार जे वर्गीकरण केले जाते त्या वर्गीकरणाच्या आकृतिबंधात १९९८ ते २००५ या काळात काय बदल कसे साकारले ते पाहणे उद्बोधक ठरावे. या संदर्भातील आकडेवारी पुढील पानावरील तक्त्यात मांडलेली आहे. लघुउद्योगांच्या गटात मोडणारे व्यवसायघटक नेमक्या कोणत्या उत्पादनप्रकारांत बव्हंशी एकवटलेले आहेत, याचे स्पष्ट सूचन तक्त्यातील सांख्यिकी आपल्याला घडवते. इथे आघाडीवर दिसतो तो कापडउद्योग. परंतु, कापड उद्योगातील लघुउद्योगांची संख्या व त्या लघुउद्योगांत गुंतलेल्या कामगारांची संख्या या दोहोंतही १९९८ ते २००५ या काळात जबरदस्त घट घडून आल्याचे संबंधित आकडेवारीवरून

स्पष्ट होते. केवळ इतकेच नाही तर, कापड उद्योगातील लघुउद्योगांचे राज्यातील एकंदर लघुउद्योगांमध्ये असणारे प्रमाण आणि लघुउद्योगांमधील कामगारांच्या राज्यभरातील एकूण संख्येत कापड उद्योगांत गुंतलेल्या कामगारांचे असलेले प्रमाण या उभयतांत १९९८ ते २००५ या काळात तितकीच लक्षणीय घट घडून आल्याचे दिसते. कापड उद्योगाची ही जी घसरण झालेली दिसते तिच्यात घसघशीत वाटा आहे तो या उद्योगाला ठाणे जिल्ह्यात बसलेल्या जबरदस्त फटक्याचा. कापड उद्योगात सक्रिय असणा-या लघुउद्योगांची ठाणे जिल्ह्यातील संख्या १९९८ साली ४ हजार ८६६ इतकी होती. या उद्योगघटकांत एकंदर १ लाख ११ हजार ५४२

| उत्पादन प्रकार | एकूणातील टक्केवारी (कारखाने) १९९८ | एकूणातील टक्केवारी (कारखाने) २००५ | एकूणातील टक्केवारी (कामगार) १९९८ | एकूणातील टक्केवारी (कामगार) २००५ | वाढीची टक्केवारी कारखाने | वाढीची टक्केवारी कामगार |
|---|---|---|---|---|---|---|
| कापडउद्योग | ३२.१६ | २०.९८ | ३३.४५ | १९.९७ | -६३.१५ | -६६.७९ |
| फॅब्रिकेशन | १३.७७ | १२.५२ | १३.९८ | १२.२७ | -४८.६६ | -५०.७५ |
| काच, सिरॅमिक इ. | ११.०६ | ७.५५ | १०.५० | ७.५१ | -६१.४५ | -५९.१६ |
| खाद्यपदार्थ व पेय | ७.०९ | १०.०७ | ६.९६ | ९.६३ | -१९.७२ | -२१.८४ |
| रसायने व रासायनिक उत्पादने | ५.७५ | ७.३३ | ६.४३ | ८.४४ | -२८.० | -२५.६० |
| रबर व प्लॅस्टिक | ५.०७ | ५.०६ | ४.९८ | ५.१० | -४३.५५ | -४१.७० |
| फर्निचर व अन्य | ४.७९ | ५.९५ | ३.६५ | ५.८६ | -२९.८३ | -१०.६१ |
| तयार कपडे | ४.४९ | ५.४६ | ४.०३ | ४.८४ | -३१.३२ | -३२.६४ |
| यंत्रसामग्री | ३.१२ | ४.४३ | ३.२४ | ४.७० | -१९.६९ | -१८.३३ |
| विद्युत यंत्रसामग्री | ०.९५ | २.८१ | १.०१ | ३.०७ | ६७.६१ | ७४.५४ |
| मूलभूत धातूउद्योग | ०.७७ | ३.४८ | ०.८४ | ३.७४ | १५६.९८ | १५१.५६ |
| मोटार वाहने | ०.७० | २.१५ | ०.७० | २.३२ | ७३.८९ | ८८.३२ |
| एकूण | २२४७० | १२६९५ | ४८४१९४ | २७०४०८ | -४३.५० | -४४.१४ |



कामगार तेव्हा काम करत होते. २००५ सालासाठीच्या आकडेवारीनुसार कापडनिर्मितीमध्ये गुंतलेल्या लघुउद्योग घटकांची ठाणे जिल्ह्यातील संख्या थेट ७४९ पर्यंत ढासळली तर त्या उद्योगघटकांतील रोजगारही १५ हजार १७४ पर्यंत खालावला. कापडनिर्मितीच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या लघुउद्योगांचे केंद्रीकरण झालेले राज्यातील अन्य दोन जिल्हे म्हणजे सोलापूर आणि नाशिक. कापड उद्योगात कार्यरत असलेल्या सोलापूर व नाशिक येथील लघुउद्योगांचीही १९९८ ते २००५ या काळात घसरण झाल्याचे आकडेवारी सांगते मात्र ठाणे जिल्ह्याच्या तुलनेत ती घसरण बरीच सौम्य दिसते. एखाद्या उत्पादनप्रकारात एखाद्या ठिकाणी बस्तान बसलेल्या एखाद्या उद्योगाच्या भागधेयात अतिशय थोडक्या कालावधीत प्रचंड मोठ्या प्रमाणावर स्थित्यंतर घडून येणे हे फारसे अतर्क्य गणता येत नाही, हाच या सगळ्याचा इत्यर्थ. दुसरे म्हणजे, हे असे स्थित्यंतर अतिशय वेगाने व अवचितही घडून येणे संभवनीय ठरते. आर्थिक जनगणनेसारख्या उपक्रमांद्वारे संकलित करण्यात येणा-या आकडेवारीत प्रदीर्घ काळ खंड पडला तर अशा वेगवान बदलांचा सुगावा धोरणकर्त्यांना वेळीच लागणे दुरापास्त बनते अथवा बनेल. त्यापायी सुशासनाचा दर्जा ढासळून ते परिणामहीन सिद्ध व्हावे, हे ओघानेच येते.

फॅब्रिकेशनच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या राज्यातील लघुउद्योगांनी त्यांचे दुस-या क्रमांकावरील स्थान १९९८ आणि २००५ अशा दोन्ही वर्षांत अबाधित राखलेले असले तरी या गटातील लघुउद्योगांमधील रोजगारात दरम्यानच्या काळात घट झालेली दिसतेच. अ-लोहित खनिज उत्पादनांच्या गटात कार्यरत असलेल्या लघुउद्योगांमधील रोजगार १९९८ ते २००५ या काळात जसा घटलेला दिसतो तसेच, राज्यातील एकंदर लघुउद्योगांमध्ये या उत्पादनक्षेत्रात कार्यरत असलेल्या उद्योगांचे असलेले प्रमाण आणि राज्यातील लघुउद्योगांमधील एकूण रोजगारात या उत्पादनक्षेत्रातील लघुउद्योगांत गुंतलेल्या श्रमिकांचे असलेले प्रमाण या दोहोंतही १९९८ आणि २००५ या दोन कालबिंदूंदरम्यान चांगली जबर घसरण झाल्याचे आकडेवारीवरू न स्पष्ट होते. लघुउद्योगांच्या या उपगटात वीटभट्ट्यांचे प्रस्थ बरेच मोठे आहे. एकंदरीनेच लघुउद्योगांचा हा उपगट चांगल्यापैकी

अडचणीच्या पर्वातून वाटचाल करीत असल्याचे आकडेवारीवरून जाणवते. या सगळ्याला एकमात्र अपवाद दिसतो तो मूलभूत धातूंच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या लघुउद्योगांचा. या उत्पादनप्रकारात गुंतलेल्या लघुउद्योगांची संख्या आणि त्या लघुउद्योगांत काम करणा-या श्रमिकांची संख्या या दोहोंतही १९९८ आणि २००५ या कालावधीदरम्यान सर्वाधिक वाढ झाल्याचे तक्त्यातील सांख्यिकीवरून आपल्या ध्यानात येते. या उत्पादनप्रकारात गुंतलेल्या उद्योगघटकांची संख्या आणि त्या उद्योगघटकांत निर्माण झालेला रोजगार या दोहोंतही १९९८ ते २००५ या काळादरम्यान वाढ दाखवणारे महाराष्ट्रातील जिल्हे म्हणजे ठाणे, नाशिक, पुणे, कोल्हापूर, अहमदनगर आणि जालना. या खालोखाल क्रमांक दिसतो तो मोटरी तसेच ट्रेलर तयार करणा-या उद्योगघटकांचा. या उत्पादनप्रकारातील उद्योगांची संख्या आणि त्यांत काम करणारे श्रमिक अशा दोन्ही पातळ्यांवर या उद्योगाचा पसारा चांगल्यापैकी विस्तारलेला दिसतो. या वाढीमध्ये सगळ्यांत आघाडीवर आहे तो पुणे जिल्हा. हे असे असले तरी फॅब्रिकेशन आणि मूलभूत खनिजांच्या क्षेत्रात कार्यरत असणा-या लघुउद्योगांमधील रोजगाराचे राज्यातील लघुउद्योग क्षेत्रात निर्माण झालेल्या एकंदर रोजगारामध्ये असलेले प्रमाण तसे चिमुकलेच आहे. यंत्रसामग्री व उपकरणे तयार करणारे लघुउद्योग तसेच फर्निचरनिर्मितीमध्ये सक्रिय असणारे लघुउद्योग अंमळ निराळा कल दाखवतात. या दोन उत्पादनप्रकारांत गुंतलेल्या लघुउद्योगांची संख्या व त्यांत रोजगार मिळालेल्या श्रमिकांची संख्या या दोहोंत १९९८ ते २००५ दरम्यान किंचितशी घट झालेली असली तरी एकूणांतील त्यांच्या प्रमाणात मात्र काहीशी वाढ झालेली दिसते. नेमका असाच काहीसा प्रकार अन्नपदार्थ तसेच पेयजलांच्या निर्मितीमध्ये सक्रिय असणा-या लघुउद्योगांच्याबाबतीत आढळून येतो. तयार कपड्यांच्या उत्पादनामध्ये असणा-या लघुउद्योगांची कथाही यांपेक्षा निराळी नाही.

एकंदरीने पाहता, १९९८ ते २००५ या काळात महाराष्ट्रातील सर्वसाधारण औद्योगिक विकास रडतखडत मार्गक्रमण करीत राहिला. राज्यातील लघुउद्योग क्षेत्रानेही त्याच्याच पावलावर पाऊल ठेवावे हे त्यांमुळेच अस्वाभाविक म्हणता येत नाही. परंतु, राज्यातील लघुउद्योगांच्या



गटात १९९८ ते २००५ या काळात जे स्थित्यंतर घडून आले त्याचे बारकाईने परीक्षण केले तर त्या स्थित्यंतराला एक रोचक भौगोलिक परिमाण लाभलेले असल्याचे आपल्या ध्यानात येते. व्यवसायाच्या स्थानांकनाबाबत तसेच पुनर्स्थानांकनाबाबत निवड करण्यासंदर्भात राज्यातील लघुउद्योग क्षेत्र सक्षमपणे निर्णय घेत असल्याचे वास्तव, ठाणे जिल्ह्याची पीछेहाट एकीकडे चालू असतानाच पुणे जिल्ह्याचा दुसरीकडे होत असलेला उदय आपल्या पुढ्यात उलगडून मांडतो. उद्योगस्थापनेसाठी उद्योजक ठिकाणाची निवड नेमकी कशी आणि कोणत्या निकषांच्या आधारे करतात, उद्योजकांच्या त्या निवडीवर प्रभाव टाकणारे घटक नेमके कोणते असतात यांचा अभ्यास करणे म्हणूनच अतिशय उचित व उपयुक्त ठरेल. एखाद्या ठिकाणी भरभराटीला आलेला एखादा उद्योगप्रकार आणि ते ठिकाण यांचाही काही तरी अन्योन्य संबंध असावा असे दिसते. उद्योगांच्या स्थानांकनातील बदलांचे त्या त्या उद्योगांमध्ये रोजीरोटी कमावणा-या श्रमिकांवर जे परिणाम घडून येतात त्यांचाही अभ्यास या संदर्भात कळीचा ठरतो. उद्योगांच्या पुनर्स्थानांकनामुळे समाजस्तरावर साकारणा-या व्यापक स्वरूपाच्या सामाजिक-आर्थिक परिणामांचे आपले आकलन अशा अभ्यासांद्वारे समृद्ध बनू शकेल.

लघुउद्योगांच्या स्थापना-विस्तारात नांदणारी सघन अशी प्रादेशिक विषमता संबंधित आकडेवारीच्या अशा विश्लेषणाद्वारे आपल्या पुढ्यात उमटते. औद्योगिक आकडेवारीच्या विश्लेषक अभ्यासाचा हा आणखी एक अतिशय महत्त्वाचा पैलू ठरतो. औद्योगिकरणाच्याबाबतीत देशभरात आजवर महाराष्ट्र जरी अग्रस्थानावर राहत आलेला असला तरी या विकासाचे लाभ पश्चिम महाराष्ट्रातील मोजक्या ८-१०जिल्ह्यांव्यतिरिक्त अन्य भागांच्या ओंजळीत पडलेले दिसत नाहीत. राज्याच्या पूर्व भागातील मराठवाडा व विदर्भासारखे प्रदेश औद्योगिक विकासापासून आजही वंचितच राहिलेले दिसतात. आर्थिक-औद्योगिक विकासाच्याबाबतीत महाराष्ट्रात नांदणारा हा प्रादेशिक असमतोल पूर्वापारचा आहे. हे चित्र कधी तरी सुधारेल का, या प्रश्नाचे उत्तर अजूनही गवसलेले नाही. **■डॉ. शरदिनी रथ**

**डॉ. शरदिनी रथ या भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या संलग्न अभ्यासक आहेत.**

# अर्थबोधपत्रिका पुरवणी

## राष्ट्रीय वाहतूक विकास धोरण समिती अहवालाच्या निमित्ताने....

**● डॉ. एस्. श्रीरामन**

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये आजवर घडून आलेल्या आणि भविष्यात अपेक्षित असलेल्या बदलांना योग्य प्रतिसाद देऊ शकेल अशा प्रकारची वाहतूक व्यवस्था येत्या काळात विकसित करण्याबाबत दीर्घकालीन धोरण तयार करण्यासाठी केंद्र सरकारने नियुक्त केलेल्या ''राष्ट्रीय वाहतूक विकास धोरण समिती''ने (नॅशनल ट्रान्स्पोर्ट डेव्हलपमेन्ट कमिटी) तिचा अहवाल सादर केल्याने आपल्या देशातील वाहतूक प्रणालीच्या भविष्यकालीन सक्षमीकरणाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलले गेलेले आहे. साधारणपणे तीन दशकांपूर्वी, म्हणजे, १९७७ ते १९८० या काळात तेव्हा नेमण्यात आलेल्या राष्ट्रीय वाहतूक धोरण समितीने अशाच प्रकारचा एक अभ्यास केलेला होता. त्या अभ्यासावर बेतलेला समितीचा अहवाल केंद्र सरकारला १९८० साली सादर करण्यात आला. परंतु, वाहतूक क्षेत्रासारख्या अत्यंत कळीच्या क्षेत्रासंदर्भात त्या नंतरच्या ३० वर्षांत भरीव असे फारसे काहीच आपल्या देशात घडले नव्हते. नाही म्हणायला, वाहतूक नियोजन आणि धोरणासंदर्भात अभ्यास करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या एका सुकाणू समितीने वाहतूक क्षेत्रापुरताच सीमित असणारा तिचा अहवाल १९८८च्या आगेमागे सादर केला होता. त्या नंतरही अधुनमधून ज्या काही वेगवेगळ्या समित्या नेमल्या गेल्या त्यांनी त्या त्या वेळी नेमून दिलेले अभ्यास व पाहण्या केल्या, नाही असे नाही. अखेर, केंद्र सरकारने २००६ साली सिद्ध केलेल्या राष्ट्रीय नागरी वाहतूक धोरणविधानामध्ये अशा सगळ्या उपक्रमांची परिणती घडून आली. परंतु, आपल्या देशातील वाहतूक क्षेत्राच्या सद्यःस्थितीबाबत तसेच भविष्यकालीन चित्राबाबत एक सर्वंकष भूमिका घेणाऱ्या दस्तऐवजाची वानवा जाणवत होतीच. ती उणीव या अहवालाने भरून काढली आहे, असे मानण्यास प्रत्यवाय नसावा.



या अहवालाबाबत आता गरज आहे ती साधकबाधक स्वरूपाची चर्चा चौफेर घडून येण्याची. त्या दृष्टीने, या अहवालातील काही मुद्यांसंदर्भात नोंदवावीशी वाटणारी काही निरीक्षणे या टिपणात मांडलेली आहेत. अहवालातील विविध प्रतिपादने, विश्लेषणे आणि शिफारशींबाबत अधिक सघन व सखोल विचारविनिमयास केवळ सुरुवात करण्याचाच हेतू या सर्व खटाटोपामागे आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेत घडून येत असलेले बदल आणि त्यांना अनुसरून वाहतूक क्षेत्रात निकडीच्या वाटणाऱ्या सुधारणा या संदर्भात या आधी नियुक्त करण्यात आलेल्या विविध समित्या तसेच अभ्यासगटांनी सादर केलेल्या अभ्यासांच्या खांद्यावरच हा नवीन पाहणी अहवाल उभा आहे, असे राष्ट्रीय वाहतूक विकास धोरण समितीने नोंदविलेले आहे. या संदर्भात आठवण होते ती, नवी दिल्ली येथील 'राइट्स्' (Rail India Technical And Economic Services : RITES) या संस्थेने आठ वर्षांपूर्वी तयार केलेल्या एका पाहणी अहवालाची. केंद्रीय नियोजन आयोगासाठी तयार केलेला तो अहवाल २००९ साली आयोगास सादर करण्यात आला.

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणाऱ्या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

आपल्या देशातील मालवाहतुकीत तसेच प्रवासी वाहतुकीमध्ये जो संरचनात्मक असमतोल पोसलेला आहे त्या संदर्भात ‘राइट्स्’ने तेव्हा केलेले भाष्य व त्यांवर आधारित सुचविलेल्या उपाययोजना यांची म्हणावी अशी दखल या ताज्या अहवालाने घेतलेली दिसत नाही. ही बाब नक्कीच खटकणारी आहे. कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये वाहतुकीचे जे एकूण प्रवाह (Trafic Flows) निर्माण होतात त्या प्रवाहांचे नेमकेपणाने मोजमाप केले जाणे हे वाहतूकविषयक कोणत्याही धोरणाच्या पायाशुद्धतेसाठी अनिवार्य ठरते. हे वाहतूक प्रवाह दोन प्रकारचे असतात. देशातील प्रांताप्रांतांदरम्यान निर्माण होणारे वाहतूक प्रवाह (Inter-regional Trafic Flows) हा झाला त्यांतील पहिला प्रकार. तर, देशातील प्रांताप्रांतांच्या सीमांतर्गत भागांत वाहत राहणारे वाहतूक प्रवाह (Intra-regional Trafic Flows) हा वाहतूक प्रवाहांच्या वर्गवारीतील दुसरा प्रवाह गणला जातो.

वाहतूक प्रवाहांच्या या दुस-या वर्गात समाविष्ट होणा-या वाहतूक प्रवाहांचे भारतीय अर्थव्यवस्थेमधील महत्त्व लक्षणीयरीत्या वाढत असल्याचे अलीकडील काळातील प्रकर्षाने अनुभवास येते आहे. प्रांताप्रांतांतर्गत सक्रिय असलेल्या अशा प्रवासी वाहतूक तसेच मालवाहतूक प्रवाहांचे नेमके मोजमाप केले जाऊन त्यांचा अंतर्भाव देशी वाहतुकीच्या एकूण प्रवाहांच्या गणितामध्ये व्यवस्थित प्रकारे करण्याचा स्तुत्य प्रयत्न ‘राइट्स्’ने केलेल्या त्या अभ्यासामध्ये करण्यात आलेला होता. ‘राइट्स्’नेच १९७० तसेच १९८०च्या दशकांत भारतीय अर्थव्यवस्थेतील वाहतुकीसंदर्भात केलेल्या अभ्यासांतही हा अतिशय महत्त्वाचा पैलू अ-लक्षित राहिलेला होता. केवळ इतकेच नाही तर, अशा प्रकारच्या मोजमापांसाठी आवश्यक असणा-या पायाभूत आकडेवारीचे आपल्या देशातील दुर्भिक्ष ध्यानात घेऊन ‘राइट्स्’ने ती उणीव भरून काढण्याच्या दृष्टीने अनुरूप अशी विश्लेषणात्मक साधने आणि प्रारूपही विकसित केलेले होते. ते प्रारूप व ती साधने जवळपास ४० वर्षांपूर्वी विकसित करण्यात आलेली असली तरी त्यांची उपयुक्तता आजही ओसरलेली नाही. ‘राइट्स्’ने केलेला तो संपूर्ण खटाटोप या समितीला व्यापक प्रमाणात उपयोगी ठरला असता.



‘राइट्स्’ने २००६ ते २००९ या कालावधीदरम्यान केलेल्या त्या खटपटीमुळे देशात निर्माण होणा-या एकंदर वाहतूक प्रवाहांचे यथातथ्य मोजमाप ‘राइट्स्’च्या त्या अहवालामध्ये उमटलेले होते. आपल्या देशातील सध्याच्या वाहतूक व्यवस्थेमध्ये रस्तेवाहतुकीचा असणारा प्रचंड वरचष्मा त्या मोजमापांमुळेच ठसठशीतपणे अधोरेखित झाला. मालवाहतूक तसेच प्रवासी वाहतुकीच्या वेगवेगळ्या पर्यायांचा अवलंब करण्यात जी साधनसामग्री (उदाहरणार्थ, सगळ्यांत महत्त्वाचे म्हणजे इंधन व त्याचा प्रकार) खर्ची पडते त्या साधनांच्या खर्चाची कोष्टकेही ‘राइट्स्’ने त्या अभ्यासात मांडलेली होती. अहवालात त्या वेळी सादर करण्यात आलेल्या हिशेबांमुळे सगळ्यांच्याच डोळ्यांत एकदम झणझणीत अंजन घातले गेले. देशी वाहतुकीमध्ये (मालवाहतूक तसेच प्रवासी वाहतूक) रेल्वेने केल्या जाणा-या वाहतुकीचा तौलनिक टक्का वाढवण्याची निकड त्या आकडेवारीने सर्वसंबंधितांच्या मनावर ठसवली.

देशांतर्गत मालवाहतुकीमध्ये त्याचप्रमाणे प्रवासी वाहतुकीमध्येही रेल्वेचा आजवर राहत आलेला तौलनिक हिस्सा वाढवण्याचा मुद्दा राष्ट्रीय वाहतूक विकास योजना समितीनेही तिच्या अहवालात अधोरेखित केलेला आहे. नाही असे नाही. परंतु, देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यापारतोलाची ढासळलेली प्रकृती रेल्वे आणि रस्ते अथवा महामार्ग या उभय वाहतूक पर्यायांच्या अधिक संतुलित व पर्याप्त वापरामुळे कशी व किती प्रमाणात सुधारेल, या अत्यंत संवेदनशील मुद्यावर मात्र समितीने द्यायला हवा होता तितका भर वास्तवात दिलेला नाही, असे वाटल्यावाचून राहत नाही. देशांतर्गत वाहतुकीमध्ये रेल्वेचा वाटा उंचावल्याने प्रवासी तसेच मालवाहतुकीसाठी रस्तेमार्गांच्या पर्यायाचा आज केला जाणारा प्रचंड प्रमाणावरील अंगीकार ब-याच अंशांनी घटेल. परिणामी, वाहनांसाठी वापरल्या जाणा-या पेट्रोल-डिझेलादी इंधनांच्या सध्या केल्या जाणा-या भरमसाठ वापरात कपात घडवून आणता येणे शक्य बनेल. तेलजन्य उत्पादनांच्याबाबतीत आपला देश आयातीवरच बव्हंशी अवलंबून आहे. या आयात इंधनांपायी आयात खर्चाचा फार मोठा बोजा तिजोरीवर पडतो. बरे, इंधनांची मागणी व वापर हा दिवसेंदिवस वाढतो आहे. त्यांतच भारतीय रुपयाचे अमेरिकी डॉलरबरोबर असलेले विनिमय मूल्य सध्या घसरलेले आहे.

भारतीय रु पयाच्या विनिमय दरात घडून आलेल्या घसरणीचे परिणाम आपण सगळेच आज अनुभवतो आहोत. आयात केल्या जाणा-या खनिज तेल व तेलजन्य उत्पादनांची रु पयातील किंमत आता चढ्या दराने मोजावी लागते आहे ती अमेरिकी डॉलरच्या तुलनेत भारतीय रु पयाच्या घडून आलेल्या त्या मूल्य-हासापायीच. युरोप-अमेरिकी बाजारपेठांमधील मंदी सरण्याची चिन्हे आजही कोठे ठळकपणे दिसत नसल्याने भारतीय उद्योगांची निर्यातही म्लान बनलेली आहे. त्यांमुळे, आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या चालू खात्यावरील तूट वाढण्याबरोबरच परकीय चलनाच्या संभाव्य टंचाईची तलवारही भारतीय अर्थव्यवस्थेच्या मानगुटीवर टांगलेली आहे. दुसरीकडे, सरकारची वित्तीय तूट वाढलेलीच आहे. वित्तीय तूट आणि देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या चालू खात्यावरील तूट यांचे परस्परांशी जैविक नाते असल्याने या जुळ्या तुटींचे संकट भारतीय अर्थव्यवस्थेची कसोटी पाहते आहे. देशी वाहतुकीच्या क्षेत्रात रेल्वेचा वाटा वाढवण्यावर लक्ष केंद्रीत केल्याने हा सगळाच चक्रव्यूह भेदणे शक्यतेच्या आवाक्यात यावे.

देशी वाहतुकीच्या क्षेत्रातील संरचनात्मक असमतोलाचे विश्लेषण या पद्धतीने मांडून रेल्वेच्या विस्तारावर समितीने तर्कशुद्ध युक्तिवादपूर्वक भर दिला असता तर धोरणात्मक उपाययोजनांचे पारडे रेल्वेच्या बाजूला झुकवणे सुकर बनले असते. मात्र ही चांगली चालून आलेली संधी या समितीने गमावली याची खंत वाटल्यावाचून राहत नाही.

रेल्वेसारखी जी सार्वजनिक वाहतूक सुविधा आज सरकार पुरवते तिची शुल्कआकारणी अधिक पायाशुद्ध प्रकारे होणे गरजेचे आहे, अशी मल्लीनाथी राष्ट्रीय वाहतूक विकास धोरण समितीने तिच्या अहवालात केलेली सापडते. अशी ढोबळ शेरेवजा टिप्पण्णी केल्याने साध्य असे फारसे काहीच होत नाही. रेल्वेला थेट व प्रत्यक्ष असे काही अनुदान देण्यापेक्षा अंतर्गत अनुदानांवरच (cross subsidization) रेल्वेची बोळवण करण्याचा पायंडा आजवर पडून गेलेला आहे. केंद्रीय अर्थसंकल्पामधून रेल्वेला भांडवली खर्चासाठी जो काही टेकू पुरविला जातो तो एकच काय तो अपवाद. अर्थात, या भांडवलाचा खर्च सरकार वसूल करत असतेच. दुसरे म्हणजे, अलीकडील काळात या भांडवली टेकूलाही ओहोटी लागलेली दिसते.



प्रवाशांना सवलतीच्या दराने वाहतूक सेवा पुरवावयाची व सवलतीपायी पडणारा खर्चाचा तो बोजा मालवाहतुकीसाठी केल्या जाणा-या शुल्कआकारणीद्वारे भरू न काढायचा (म्हणजेच अंतर्गत अनुदान) हाच आजवरचा खाक्या राहिलेला आहे. प्रवासी वाहतुकीपायी रेल्वेला अदा केल्या जाणा-या या अंतर्गत अनुदानाचा हिशेब केला तर ती रक्कम आजघडीला साधारणपणे २४ हजार कोटी रु पयांच्या घरात जाते. अर्थात, अनुदानाचे हे आकारमानही तसे अदमासेच मोजावे लागते. कारण, रेल्वेशी संलग्न नाना प्रकारच्या सेवांवर केल्या जाणा-या खर्चाचे मोजमाप व वाटप आणि अशा खर्चांची त्या नंतर होणारी वसुली यांत बरीच अंदाधुंदी दिसून येते. त्या ऐवजी, रेल्वे सेवांच्या शुल्कवाढीबाबत स्पष्ट धोरणविधान करीत शुल्कवाढीच्या बरोबरीनेच रेल्वे सेवांच्या गुणवत्तेचे निकष व गुणवत्ता वाढवण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्याचा ठोस पर्याय या समितीने अवलंबला असता तर फारच बरे झाले असते. रेल्वेच्या सेवांची वास्तवाधारित शुल्कआकारणी आणि त्यांत वेळोवेळी कराव्या लागणा-या फेरबदलांबाबतची व्यूहात्मक व्यवस्था यांचा ऊ हापोहही समितीने करायला हवा होता.

प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज वाहतुकीच्या क्षेत्राला येत्या काळात मोठ्या प्रमाणावर जाणवणार आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान हस्तगत केलेल्या तज्ज्ञ वाहतूक व्यावसायिकांच्या जोडीनेच वाहतूक क्षेत्राच्या भविष्यकालीन वाढीसाठी सुयोग्य नियोजन व धोरणात्मक आखणी करूशकणा-या दर्जेदार, कुशल कर्मचारी चमूचीही गरज देशी वाहतूक क्षेत्राला येत्या काळात सतत भासत राहणार आहे. त्या दृष्टीने, प्रशिक्षणविषयक अशी नड कोणकोणत्या संस्था कशा प्रकारे भागवू शकतील यांबाबतचा ऊ हापोह समितीने तिच्या अहवालात केलेला आढळतो. परंतु, इथेही एक गफलत होताना दिसते. वाहतूक क्षेत्राच्या भविष्यकालीन कार्यक्षम चलनवलनासाठी प्रशिक्षित मनुष्यबळाची तरतूद करण्याबाबतच्या सगळ्या विचारमंथनात केवळ अतिकुशल, अति उच्च प्रकारच्या तसेच काही विशेष सेवाक्षमता अंगी निर्माण करणा-या प्रशिक्षणप्रकारांवरच संबंधित प्रयत्नांचे लक्ष सर्वस्वी केंद्रीत होणे चुकीचे ठरेल. आपल्या देशाच्या कानाकोप-यांत पसरलेल्या मालमोटरींच्या क्षेत्राचे उदाहरण या संदर्भात अतिशय उद्बोधक ठरते.

मालमोटरींद्वारे होणारी मालवाहतूक हा आपल्या देशातील रस्तेवाहतुकीच्या एकंदर क्षेत्राचा जणू गाभाच. चांगल्या प्रशिक्षित, कुशल मालमोटर चालकांची या क्षेत्राला आज कित्येक वर्षे तीव्र वानवा जाणवते आहे. या संदर्भातील सगळ्यांत मोठा विरोधाभास म्हणजे, मालमोटर वाहतूक व्यवसायाची ही निकड ध्यानात घेऊन या व्यवसायाला चांगले दर्जेदार चालक पुरेशा प्रमाणात सतत उपलब्ध व्हावेत यांसाठी सरकारी पातळीवरून कोणत्याही प्रकारचे ठोस प्रयत्न आजवर झालेले नाहीत. कुशल मालमोटर चालक तयार करण्यासाठी मोटर वाहतुकीच्या क्षेत्रात कार्यरत असणा-या खासगी व्यावसायिकांना हाताशी धरावे, त्यांना काही प्रोत्साहन द्यावे, चारचाकी वाहन चालवण्याचे दर्जेदार शिक्षण देणा-या संस्थांचे जाळे निर्माण होण्यासाठी पावले उचलावीत... असे काही पर्याय कोणीही हाताळून बघताना दिसत नाही. मालमोटर वाहतूक क्षेत्राच्या सर्वसाधारण कार्यक्षमतेशी थेट संबंधित असलेल्या इतक्या व अशा कळीच्या बाबींकडे दुर्लक्ष केले जाण्याचे प्रतिकूल परिणाम उभ्या वाहतूक क्षेत्राला उद्या भोगावे लागतील हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ नाही का ?

भारतीय अर्थव्यवस्थेच्या धमन्या समजल्या जाणा-या वाहतूक क्षेत्रातील गुंतवणूक वाढवण्यासंदर्भात राष्ट्रीय वाहतूक विकास धोरण समितीने तिच्या अहवालात ज्या पोटतिडिकेने युक्तिवाद केलेला आहे तितक्याच निकराने समितीने, वाहतूक क्षेत्रात आजघडीला केल्या गेलेल्या गुंतवणुकीची उत्पादकता व कार्यक्षमता वाढवण्याची गरज प्रतिपादन केली असती तर ते अधिक उपकारक ठरले असते. या संदर्भातही पुन्हा रेल्वेसेवेकडे दृष्टिक्षेप टाकणे उपयुक्त ठरते. केवळ मालवाहतुकीसाठीच वाहिलेल्या रेल्वेमार्गांचे पट्टे (Dedicated Freight Corridors) येत्या काळात विकसित होऊ घातलेले आहेत. हे वास्तव ध्यानात घेता रेल्वेच्या एकंदरच वहनक्षमतेचा वापर अधिक कार्यक्षमतेने करण्याच्या दिशेने पावले उचलणे व्यवहारात अवघड ठरता कामा नये. परंतु, निव्वळ लोकानुनयाच्या -हस्व राजकारणाला बळी पडून रेल्वेच्या दर अर्थसंकल्पात नवनवीन प्रवासी गाड्यांची घोषणा करण्याची प्रत्येक रेल्वेमंत्र्याची अनावर हौस या मार्गातील सर्वांत मोठी व मुख्य धोंड ठरते आहे.



साहजिकच, रेल्वेने केली जाणारी मालवाहतूक व प्रवासी वाहतूक यांतील पर्याप्त संतुलन या पायी पार ढासळून गेलेले आहे. वास्तविक पाहता, रेल्वेच्या वित्तीय प्रकृतीचा विचार केला तर मालवाहतूक हा महसुलाच्या दृष्टीने केव्हाही अधिक किफायतशीर पर्याय ठरतो. मात्र, दर रेल्वे अर्थसंकल्पात प्रवासी वाहतुकीसाठी डझनावारी नवीन गाड्यांची घोषणा करण्याच्या सवंगपणामुळे मालवाहतुकीसाठी भारतीय रेल्वेच्या ठायी ज्या क्षमता निर्माण करून ठेवलेल्या आहेत त्यांचा पुरेपूर वापर होऊ शकत नाही. त्यांमुळे हा सगळाच व्यापार आतबट्ट्याचा ठरतो. खरे पाहता, वाहतुकीच्या वित्तीय शिस्तीचा तसेच वाहतूक सेवेच्या अर्थकारणातील तर्कसुसंगतीचा विचार करता जवळच्या व कमी अंतरांच्या प्रवासासाठी रेल्वेच्या तुलनेत रस्त्यांनी केली जाणारी प्रवासी वाहतूक, दर एकक अंतरामागील वाहतूकखर्चाचा विचार करता अधिक किफायतशीर ठरते. त्यांमुळे, जवळच्या वा कमी अंतरासाठी केल्या जाणा-या रेल्वेच्या प्रवासी वाहतूक सेवा बंद केल्या जाव्यात, अशा शिफारशी या आधीच्या अभ्यासांमधून केलेल्या आढळतात. रेल्वेमार्गांच्या विद्यमान जाळ्यावरील ताण कमी होण्याबरोबरच दीर्घपल्ल्याची प्रवासी आणि मालवाहतूक रेल्वेने केली जाण्याच्या शक्यता त्यांमुळे वास्तवात उतरणे सोपे बनते. याचा एकंदरीने अनुकूल परिणाम रेल्वेच्या प्रस्थापित क्षमतांचा वापर आणि पर्यायाने रेल्वेसेवेचे अर्थकारण या दोहोंवर घडून येत असतो. त्यांमुळे, राष्ट्रीय वाहतूक विकास धोरण समितीने हे वास्तव तिच्या अहवालात अधिक आग्रहपूर्वक पवित्रा घेऊन विशद करायला हवे होते.

परंतु, रेल्वेमधील एक गुंतवणूक तेवढी वाढवली की सगळे एकदम सुरळीत होईल, असा मात्र याचा अर्थ कोणी काढू नये. देशांतर्गत वाहतुकीच्या क्षेत्रात रेल्वेचा आज असणारा तौलनिक हिस्सा वाढवण्यासाठी रेल्वेसेवेलाच नवीन दिशा देण्याची गरज आहे. रेल्वेच्या क्षमतांचा वाढीव मात्रेने वापर करून घेणे, रेल्वेसेवांच्या शुल्कआकारणीचा विचार निखळ शुद्ध व्यावसायिक तत्त्वांना अनुसरून करणे... अशा अनेक आघाड्यांवर त्यांसाठी समांतर प्रयत्न केले जाणे गरजेचे आहे. राष्ट्रीय वाहतूक विकास धोरण समितीने याही मुद्द्यांवर ठोस व आग्रही भूमिका मांडायला हवी होती. ■■

## प्रमुख संदर्भ

**(A)Books/Reports** - (1) United Nations Economic and Social Council, Permanent Forum on Indigenous Issues (Indigenous Peoples, Indigenous Voices Fact Sheet and other Study Reports) (2)Nuclear Scholars Initiative, CSIS, January 2014

**(B)Websites** -(1)http://un.org/en/events (2) http://www.worldfuturecouncil.org/fileadmin/user_upload/PDF/110517_WFC_Scheffran_Report.pdf (3) http://www.astro.cornell.edu/academics/courses/astro202/TTAPS2 _SciAm84.pdf

**Poverty in India**

**लेखक वि.म. दांडेकर, नीळकंठ रथ**

(पृष्ठे १४०, किंमत : २०० रुपये)

**अर्थकारण-समाजकारणाचे जिज्ञासू, साक्षेपी संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी अशा सर्वांना उपयुक्त असा मौलिक ग्रंथ**

**दुसरी आवृत्ती प्रकाशित**

*आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणा-या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ*

**कर्ता-करविता**

**आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन**

लेखक - रमेश पानसे, राज्यश्री क्षीरसागर, अनिता देशमुख-बेल्हेकर

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

●मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

पृष्ठे २४२ किंमत ३५०/-रुपये



## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

### 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**वार्षिक वर्गणी** फक्त १०० / - रुपये

**द्वैवार्षिक वर्गणी** फक्त १८० / - रुपये

**त्रैवार्षिक वर्गणी** फक्त २६० / - रुपये व एक पुस्तिका भेट

**पंचवार्षिक वर्गणी** फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये)

(२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी)

(३) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये)

# ग्रंथालयातील पुस्तके

**Gorkhaland: Crisis of Statehood, written by Romit Bagchi, Sage Publications India Pvt.Ltd., New Delhi, First published in 2012, pp xxiii + 445, Price Rs. 895/-**

राज्यांच्या पुनर्रचनेचा प्रश्न आपल्या देशात पुन्हा एकवार गाजू-गर्जू लागलेला आहे. सर्वांगीण विकासाच्या प्रक्रियेत परिघावर फेकल्या गेलेल्या भूभागांतील स्थानिकांच्या मनात बराच काळ खदखदणा-या असंतोषाचे रू पांतर स्वतंत्र राज्याच्या अथवा प्रादेशिक स्वायत्तता बहाल केल्या जाण्याबाबतच्या मागणीमध्ये घडून येते, असा आजवरचा सार्वत्रिक अनुभव आहे. परंतु, स्वतंत्र राज्याच्या मागणीला विकासाच्या प्रश्नाप्रमाणेच वांशिक, भाषिक, सांस्कृतिक अथवा प्रादेशिक अस्मितेशी निगडित पैलूंचे अस्तर जोडलेले असेल तर नवीन राज्याच्या निर्मितीचा विषय अधिकच संवेदनशील आणि गुंतागुंतीचा बनतो. त्यांतच, या प्रश्नाला शेजारी राष्ट्रांबरोबरच्या राजनैतिक संबंधांचे आणखी एक परिमाण लगडलेले असेल तर विचारायलाच नको. पश्चिम बंगालच्या दार्जीलिंग परिसरातील डोंगराळ प्रदेशांचे व तेथील स्थानिक समाजांचे स्वतंत्र असे गोरखालॅन्ड हे राज्य स्थापन केले जावे, ही ब-याच काळापासून उठवली जात असलेली मागणी याच गटातील आहे. दार्जीलिंग परिसरात पूर्वापार वस्ती करू न असणा-या नेपाळी भाषिक समाजाने स्वतंत्र राज्याची अथवा प्रादेशिक स्वायत्ततेची आपली मागणी प्रथम मुखर केली ती १९०७ साली. या प्रदेशाच्या व्यवस्थापनासाठी स्वतंत्र अशी प्रशासकीय यंत्रणा निर्माण केली जावी, हा त्या वेळच्या मागणीचा गाभा होता. पुढे या प्रश्नाने अनेकानेक वळणे घेतली. परंतु, सुभाष घिशिंग यांच्यासारख्या लढाऊनेत्याचा या आंदोलनाच्या क्षितिजावर १९८१ साली उदय झाल्यानंतर या सगळ्याच संघर्षाला वेगही आला आणि एक नवीन वळणही लाभले. या सगळ्या सव्यापसव्याचा तपशीलवार वेध घेणारा हा ग्रंथ म्हणजे एक महत्त्वाचा संदर्भस्त्रोत ठरतो. ■■



RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Postal Regn.No.: PCW/115/2013-2015
Posted at Model Colony Post Office Pune, on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**- संस्थेचे नियंत्रण मंडळ -**

●विकास चित्रे ●सुरिंदर जोधका ●रमानाथ झा ●अभय टिळक
●रवींद्र ढोलकिया ●ललित देशपांडे ●आनंद नाडकर्णी ●दिलीप नाचणे
●सुहास पळशीकर ●मनोहर भिडे ●योगेंद्र यादव ●नीळकंठ रथ
●ए.वैद्यनाथन ●एस. श्रीरामन

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**